स्नेह भोज
स्वाद जिसे ये मिल सका !
बारसे, डोहाळे जेवण, साखरपुडा, गेट टू गेदर
अश्या छोटेखानी समारंभांसाठी
परफेक्ट हॉल आणि सोबत
स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये
सुटसुटीत कार्यक्रम
रुचिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहमदनगर
86 98 8080 88

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा | व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. १९४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. ०६.०८.२०२४ | अंक नं. १३४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६९ वे | ANR/022/2018-2020

शुध्द आरोग्यदायी ड्रायफ्रुटस्
काजु | खिसमिस | खोबरं | केर सांगरी | मेलन सीडस्
बदाम | काळा मनुका | गाईचे तुप | कागदी बदाम | खारीक खोबरं मिक्स
अंजीर | जरदाळू | धावडा डिंक | सनफ्लॉवर सीडस् | खारा काजू
अक्रोड | मखाना | मामरा बदाम | चिया सीडस् | मसाला काजू
खारा पिस्ता | खारीक | खजुर | पमकीन सीडस् | खारा बदाम
ड्राईड पायनापल, मँगो, किवी, स्ट्रॉबेरी, पॉमेलो, क्रॅनबेरी, मिक्स फ्रुट
सगळ्या दर्जा माफक ७०
भूमी एजन्सीज. सुकामेवा आणि मसाल्याचे होल व किरकोळ विक्रेते
मिक्स खडा मसाला उपलब्ध
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452

VEGETARIAN
राजमोती साबुदाणा
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
१ किलो । ५०० ग्रॅम । २५० ग्रॅम
RAJ MOTI
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
• इन्स्टंट साबुदानासुद्धा उपलब्ध!
aBhee

मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २७ ऑगस्ट रोजी 'राज्यव्यापी व्यापार बंद'

नगर – अन्नधान्याला जीएसटी लागू झालेला असल्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती नियमन (सेस) रद्द करा, लिगल मेट्रोलॉजी कायदा नियम ३ मधील प्रस्तावीत बदल करु नये, जी.एस.टी. कायदा सुटसुटीत करावा. दरमहा रिटर्नची संख्या कमी करावी. खरेदीवरील सेटऑफ संबंधी मागील अडचणी दूर कराव्यात, या मागण्यांच्या समर्थनार्थ २७ ऑगस्ट रोजी राज्यव्यापी लाक्षणिक व्यापार बंद करण्याबाबत निर्णय व्यापारी संघटनांनी घेतला आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज ॲण्ड ॲग्रीकल्चर (मुंबई), फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रिज ॲण्ड ट्रेड (मुंबई), दि ग्रेन, राईस ॲण्ड ऑईल सीडस् मर्चंटस् असोसिएशन (मुंबई) व दि पूना मर्चंटस् चेंबर (पुणे) च्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांच्यातर्फे ४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता दि पूना मर्चंटस् चेंबर, पुणे येथे महाराष्ट्रातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समिती व खाद्यान्न वस्तूंचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी राज्यव्यापी परिषदेचे आयोजन केले होते. तसेच या परिषदेसाठी महाराष्ट्रातील

राज्य व्यापारी कृती समितीच्या पुण्यातील बैठकीत ठराव

मुंबई, नवी मुंबई, उल्हासनगर, नाशिक, जळगांव, भुसावळ, जुन्नर, नारायणगांव, चाकण, बारामती, अहमदनगर, बार्शी, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, कराड, सातारा इ. ठिकाणाहून संघटनांचे १५० पदाधिकारी तसेच चेंबरचे सभासद उपस्थित होते. आजच्या परिषदेचे अध्यक्षपद ललीत गांधी यांनी भुषविले. सदर परिषदेमध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती समस्यांबाबत, लीगल मेट्रोलॉजी ॲक्ट तसेच जी.एस. टी. संदर्भात असलेल्या समस्या इ. विषयावर चर्चा झाली.

या परिषदेस महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललीत गांधी, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) चे अध्यक्ष जितेंद्र शहा व संचालक प्रितेश शहा, चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रिज ॲण्ड ट्रेड प्रफुल्ल संचेती, दि ग्रेन, राईस ॲण्ड ऑईल सीडस् मर्चंटस् असोसिएशन (मुंबई) चे उपाध्यक्ष अमृतलाल जैन, सचिव भिमजीभाई मानुशाली, पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फत्तेचंद रांका, दि पूना मर्चंटस् चेंबरचे अध्यक्ष रायकुमार नहार, माजी अध्यक्ष राजेंद्र बाठिया, अजित सेटिया, सांगली चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अमरसिंह देसाई, शरद शहा, सोलापूरचे सुरेश चिक्कळी, कोल्हापूरचे प्रविण देसाई, लातूरचे पांडुरंग मुंदडा, पंढरपूरचे अध्यक्ष पद्माकुमार प्रकाशचंद गांधी आदी पदाधिकाऱ्यांनी मते मांडली. या प्रसंगी चेंबरचे माजी अध्यक्ष प्रविण चोरबेले व सहसचिव आशिष दुगड तसेच महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष दिलीप गुप्ता मंचावर उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या सर्व ६ महसूल विभागातून राज्यस्तरीय व्यापारी मेळावे कृती समितीच्या माध्यमातून आयोजित केले जातील. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २७ ऑगस्ट रोजी एक दिवसाचा लाक्षणिक बंद देवण्यात येईल व तद्नंतर संपूर्ण राज्याचे व्यापारी आंदोलनासाठी मुंबई येथे एकत्र येतील. तत्पूर्वी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, व पणनमंत्री यांना व्यापाऱ्यांच्या मागण्यांचा ठराव सादर करण्यात येईल.

स्वागत रायकुमार नहार यांनी केले. प्रास्तविक राजेंद्र बाठिया यांनी केले. आभार ईश्वर नहार यांनी मानले. सुत्रसंचालन उत्तम बाठिया यांनी केले.

सुप्रसवर ... सुप्रसवर ..... सुप्रसवर .....
जीवन ज्योत मेडिकल फाउंडेशनच्या
बॉम्बे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
शासकीय नोकरीची पात्रता व हमी असलेले कोर्स
विद्यमानांसाठी प्रेरणा मार्गे करीअर पदवधारणी उत्तम संधी
प्रवेश देणे चालू आहे
(महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त)
कॉलेज फी १५५०० रु प्रती वर्ष
पात्रता : १० वी / १२ वी / पास-नापास
कोर्स कालावधी : २ वर्ष
DIP. IN RADIOLOGY TECHNICIAN
(X-Ray/ECG/CT Scan/M.R.I./Sonography/Cath Lab/Dialysis)
नगर / महानगरपालिका, जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकिय ग्रामीण/ जिल्हा रुग्णालय, निमशासकिय, खाजगी, सुपर स्पेशालिटी, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळण्याची सुवर्णसंधी उपलब्ध एकूण- ३ मिळून बनविलेल्या कोर्सची मध्ये किंवा एकत्र-१ साठी लागणारे वेगेगळ्यास्या कांपनीमध्ये जॉब करु शकतात.
वयाची अट नाही ... त्वरा करा .... मयादित जागा .....
संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक शासकिय व निमशासकिय रुग्णालयामध्ये हा अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थांना रेडीयोलॉजीची टेक्निशियन पदासाठी (रु. १३००-३५००० वेतन मे १५००) भरती प्रक्रिया झाली आहे. शासकिय अप्रेंटीशिपची सुविधा.
महाराष्ट्र शासनाचे Paramedical Council मध्ये रजिस्टेशन करता येते.
शासकीय शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्जासाठी मार्गदर्शन
अधिक माहिती व प्रवेशाशाठी आजच संपर्क करा
8830685732, 9373560452
बॉम्बे हॉस्पिटल बिल्डिंग / बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, नगर- औरंगाबाद रोड, अहमदनगर - ४१४००१

बालकाच्या मृत्यूप्रकरणी हौद मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

नगर – शहरातील समर इब्राम शेख (वय ३, रा. इस्लामिया बेकरीजवळ, मुकुंदनगर) या बालकाचा रविवारी (दि.४) रस्त्याच्या कडेला असलेल्या पाण्याच्या हौदात पडून मृत्यू झाला होता. या प्रकरणी हौदाच्या मालकावर सोमवारी (दि.५) भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात अल्लाफ शफी सय्यद (रा.इस्लामिया बेकरीजवळ, मुकुंदनगर) यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविवारी सायंकाळच्या सुमारास समर शेख हा कॉलनीत खेळत होता. तेव्हा शेजारी असलेल्या शादाब किराणा स्टोअर या दुकानाच्या समोर असलेल्या पाण्याच्या हौदामध्ये तो पडला. तो हौदात पडला त्यावेळी त्याला कोणीही पाहिले नव्हते. बराच वेळ झाला तरी मुलगा घरी न आल्याने त्याच्या कुटुंबीयांनी त्याचा बराच वेळ सर्वत्र शोध घेतला. मात्र तो सापडला नाही. बऱ्याच वेळाने कांहींचे लक्ष पाण्याच्या हौदाकडे गेल्यावर त्या ठिकाणी तो त्या हौदात पडून मयत झाल्याचे आढळून आले होते.

याप्रकरणी प्रारंभी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यामध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र या बालकाच्या मृत्यूस ज्याचा हौद आहे, त्याचा हलगर्जीपणा कारणीभूत असल्याचे समोर आल्यावर मयत बालकाचे वडील इम्रान शेख यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात सोमवारी दुपारी फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अल्लाफ शफी सय्यद विरुद्ध बी.एन.एस. २०२३ चे कलम १०५, १२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

१२/२४ तास लहान बाळ सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे
(वयोमर्यादा १८ ते ४०)
संपर्क : 8888576576

दर्जेदार व माफक दरात फ्लेक्स प्रिंटींग संपर्क : 9403232323

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्षं जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य मुंढेचा

email - navamaratha@gmail.com

श्रावणमासी... हर्ष मानसी...

सण, उत्सव, व्रतवैकल्ये आणि निसर्ग ऋतुचक्रानुसार मराठी महिन्यांची अनोखी रचना आहे. यात प्रत्येक महिन्याचं स्वतःचं एक वैशिष्ट्य ते तरी श्रावण हा या सर्वांचा राजा, ऋतुराज म्हणता येईल.

काय बहारदार असतो हा श्रावण. केवळ निसर्गात, चराचरातच नाही तर प्रत्येक मनात उत्साह बहरत असतो. सृजनशील मनांना तर प्रत्येक मनात उत्साह बहरत असतो. सृजनशील मनांना तर अधिकच अलौकिक अनुभूती लाभते.

धरती हिरवा साज लेवून सजलेली असते. मधूनच दिसणारे नेत्रदीपक इंद्रधनुष्य जणू सौंदर्यवतीच्या गळ्यातले नेकलेस वाटते. म्हणूनच की काय प्रत्येकाला मनीचे भाव व्यक्त करावेसे वाटतात. मनात नानाविध लहरी उमटतात.

श्रावणातल्या उनपावसाच्या लपंडावाप्रमाणे मनातही आशा-निराशेचा व आनंद-विरहाचा खेळ सुरू असतो. यात मनात व श्रावणाचा अनोखा संबंध दिसतो. प्रियकराला प्रियेची-सखीची तर सासुरवाशिणीला माहेराची व्याकुळ आठवण येते. कुणी सौंदर्य तर कुणी भक्तिरसात रमते. या श्रावणमासात सर्वाधिक सणवार, धार्मिक व्रते केली जातात. श्रावणी सोमवार, नागपंचमी, मंगळागौर, कृष्णजन्म, राखी पौर्णिमा इ.इ. या श्रावणवर अनेक म्हणावं, लडीवाळ भावगीतांचीही रेलचेल मन मोहवते. श्रावणात घनानिळ श्रावणमासी... हर्ष मानसी...

हसला नाचरा जरासा लाजरा.. सुंदर साजिरा श्रावण आला...

वाचनीय मननीय मेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

'एलसीबी'ची पारनेर व नेवासा परिसरातील अवैध दारु व जुगार अड्ड्यांवर छापेमारी

६१ हजारांचा गुटखा पकडला

नगर – पारनेर व नेवासा परिसरातील अवैध दारु व जुगार अड्डयांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापेमारी करत ५ आरोपींवर कारवाई केली. त्यांच्या कडून ३२ हजार ३१० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशानुसार पो.नि. दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडून सध्या जिल्ह्यात अवैध धंद्यांच्या विरोधात जोरदार कारवाईची मोहीम सुरु आहे. या पथकाने पारनेर तालुक्यातील निघोज परिसरातील हॉटेल साहिल, हॉटेल ग्रीनपार्क येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई केली, तर नेवासा बुद्रुक व मुकिंदपूर येथे ३ जुगार अड्डयांवर कारवाई केली.

मित्राने तत्काळ त्याच्या वडिलांशी संपर्क साधला व माहिती दिली. त्यानंतर पोलिसांना कळवण्यात आले. नातेवाईकांनी मुंबईत जाऊन त्याला ताब्यात घेतले व नगरला आणले.

पोलिसांनी त्याचा प्राथमिक जबाब नोंदवून पुढील तपासासाठी गुप्तचर विभाग व दहशतवाद विरोधी पथकाकडे सुपूर्द केले आहे. त्यांच्याकडून पुढील चौकशी सुरू आहे. त्याचा मोबाईलही तपासला जात आहे. तो कोणाच्या संपर्कात होता, त्याला खरोखरच पॅलेस्टाईनला जायचे होते का, कशासाठी जायचे होते, त्यासाठी त्याचे मन कोणी वळवले, याचा तपास केला जात आहे. याबाबत तोफखाना पोलिस ठाण्याचे पो.नि. आनंद कोकरे यांच्याशी संपर्क साधला असता त्या युवकाचा प्राथमिक जबाब आम्ही नोंदवला असून अधिक चौकशी व तपासासाठी त्याला दहशतवाद विरोधी पथकाच्या ताब्यात दिल्याचे त्यांनी सांगितले.

पॅलेस्टाईनला निघालेला नगरचा युवक मुंबईत पोलिसांच्या ताब्यात

गुप्तचर विभाग व दहशतवाद विरोधी पथकाकडून कसून चौकशी सुरु

नगर – पॅलेस्टाईनला जाण्याच्या मानसिकतेत असलेल्या व नगर शहरातून बेपत्ता झालेल्या एका युवकाला रोखण्यात त्याचे नातेवाईक व पोलिसांना यश आले आहे. त्याच्या मित्राच्या मदतीने नातेवाईकांनी व तोफखाना पोलिसांनी त्याला मुंबईतून ताब्यात घेतले. दरम्यान, सदर युवकाचा जबाब घेऊन त्याला पुढील चौकशीसाठी गुप्तचर विभाग व दहशतवाद विरोधी पथकाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

शहरातील बोल्हेगाव उपनगर परिसरातील एक २० वर्षीय युवक २ ऑगस्टपासून बेपत्ता झाला होता. त्याच्या वडिलांनी तो बेपत्ता झाल्याची तक्रार तोफखाना पोलिसात दिली होती. पोलिस त्याचे नातेवाईक व मित्रांकडे चौकशी करत असतानाच त्याच्या एका मित्राला त्याने इंस्टाग्रामवरून फोन करून मुंबईला बोलावले. मी तिकडे जाणार आहे, तू मुंबईत ये, येथे तुला काम मिळवून देतो, असे त्याने मित्राला सांगितले.

नगर शहरातील मोकाट कुत्री व जनावरे पकडण्यासाठी महानगरपालिकेची मोहीम

आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार तत्काळ अंमलबजावणी सुरु

नगर शहरात मोकाट कुत्रे पकडण्याची मोहीम सुरु करण्यात आली आहे. (छाया – लहू दळवी)

नगर – शहरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट व भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. मोकाट कुत्री, मोकाट मांजरी पकडून त्यांच्यावर नसबंदी शस्त्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया सुरू आहे. तत्पूर्वी, सध्याच्या परिस्थितीत मोकाट कुत्री व जनावरे पकडण्यासाठी तातडीची उपाययोजना करणे गरजेचे असल्यामुळे आयुक्त यशवंत डांगे यांनी तत्काळ विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कोंडवाडा विभागाकडून मोकाट कुत्री व जनावरे पकडण्यासाठी तत्काळ मोहीम सुरू करण्यात आली आहे.

मोकाट कुत्री,पकडून त्यांचे निर्बीजीकरण करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने निविदा प्रक्रिया राबवली आहे. त्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु, मोकाट कुत्री व जनावरांच्या बंदोबस्तासाठी नागरिकांकडून तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे मोकाट जनावरे व विशेषतः मोकाट कुत्र्यांचा तत्काळ बंदोबस्त करण्यासाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी एका खासगी संस्थेच्या माध्यमातून तत्काळ मोकाट कुत्री व जनावरे पकडण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून शहर व उपनगर परिसरात कोंडवाडा विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे.

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा अन्यथा महापालिकेत कुत्रे सोडणार

मोकाट कुत्र्यांचा हैदोस, नागरिक भयभीत- मनोज कोतकर यांचे आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन

नगर – शहरामध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून केडगाव उपनगरं-मधील कॉलन्यांमध्ये अक्षरशः २५ ते ३० कुत्र्यांच्या टोळ्या फिरत असून रात्री अपरात्री नागरिकांना घरी येणे कठीण झाले आहे. तर दिवसा ढवळ्या शाळकरी विद्यार्थ्यांवर कुत्र्यांची टोळकी हल्ला करत आहे. या आधी शहरात कुत्र्यांच्या हल्ल्यामध्ये काही मुलांचा दुर्दैवी मृत्यू देखील झाला आहे. अजून किती दिवस नागरिकांच्या जीवाशी महानगरपालिका खेळणार आहे. शहरात मोकाट कुत्र्यांचा हैदोस सुरू असून नागरिक अक्षरशः भयभीत झाले आहे. तरी अहमदनगर महानगरपालिकेने येत्या आठ दिवसांमध्ये मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा महापालिकेत मोकाट कुत्रे सोडण्याचे आंदोलन केले जाईल, असा इशारा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा या मागणीचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना देताना मनोज कोतकर. (छाया – लहू दळवी)

खासदार निलेश लंके यांना समन्स पाठविण्याचा खंडपीठाचा आदेश

डॉ. सुजय विखे पाटील यांच्या याचिकेवर आता २ सप्टेंबरला सुनावणी

नगर – खासदार निलेश लंके यांच्या निवडीला आव्हान देणाऱ्या माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात सोमवारी (दि.५) प्राथमिक सुनावणी झाली. यावेळी खा.लंके यांना समन्स पाठविण्याचा आदेश खंडपीठाने दिला असून पुढील सुनावणी २ सप्टेंबरला होणार आहे. न्यायमूर्ती किशोर संत यांच्यासमोर ही सुनावणी झाली.

नगर लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले उमेदवार निलेश लंके यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका त्यांचे प्रतिस्पर्धी महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्याकडून मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात दाखल करण्यात आली आहे.

डॉ. विखे यांनी ॲड. आबिन होन यांच्यामार्फत ५८ जुलै रोजी दाखल केलेल्या याचिकेतून काही मतदान केंद्रांवरील मोजणीवर आक्षेप घेण्यात आलेला आहे. संबंधित ४० ते ४५ केंद्रांवरील मतमोजणी योग्य पद्धतीने झालेली नाही. त्याची पडताळणी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे रितसर शुल्क भरून फेरपडताळणीची मागणी केलेली आहे. याशिवाय निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, नीलेश लंके व त्यांच्या प्रचारकांनी केलेली भाषणे विखे पाटलांची खोटी बदनामी करणारी आहेत.

तसेच निलेश लंकेंनी दाखवलेला निवडणूक खर्च आणि प्रत्यक्षातील खर्च यांचा ताळमेळ दिसून येत नाही. मुद्रित प्रचारातील साहित्याचा खर्च त्यांनी दाखवलेला नाही. परिणामी लंकेंनी दाखवलेल्या निवडणुकीतील खर्चातल्या मर्यादेचे उल्लंघन झालेले आदी मुद्यांवर सुजय विखे पाटील यांनी ही याचिका दाखल केली आहे. या सर्व बाबींमुळे निलेश लंके यांना निवडून आल्याचा जाहीर केलेला निर्णय रद्द करावा, अशी मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. खंडपीठाने याचिका दाखल करून घेतलेली आहे. त्यावर प्राथमिक सुनावणी सोमवारी (दि.५) खा.लंके यांना समन्स पाठविण्याचा आदेश न्यायमूर्ती किशोर संत यांनी दिले आहेत. आता पुढील सुनावणी २ सप्टेंबरला होणार आहे.

विषारी औषध प्राशन केलेल्या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर – घरात विषारी औषध घेऊन एकाने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील नेप्ती शिवारात घडली. नितीन रंगनाथ टुबे (वय ४०, रा. नेप्ती) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

नितीन रंगनाथ टुबे यांनी शनिवारी (दि. ३) दुपारी त्यांच्या राहत्या घरी विषारी औषध घेतले. हा प्रकार नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांची आई लहानुबाई रंगनाथ टुबे यांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा रविवारी (दि.४) दोनच्या सुमारास मृत्यू झाला.

याबाबतची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी जिल्हा रुग्णालयात ड्यूटीवर असलेले तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार जठार यांना दिली. त्यांनी दिलेल्या खबरीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, नितीन यांनी कोणत्या कारणातून विषारी औषधाचे सेवन केले याची माहिती समजू शकली नाही. अधिक तपास महिला पोलीस अंमलदार रेपाळे करत आहेत.

ज्ञानेश्वर भदारगे यांचे अल्पश: आजाराने निधन

नगर – येथील ज्ञानेश्वर भाऊसाहेब भदारगे (वय ४५, रा.भवानीनगर, मार्केटयार्ड, नगर) यांचे १ ऑगस्ट रोजी अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, मुलगा, भावजय, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे.

विमलबाई पोखर्णा यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – ढवळपुरी येथील रहिवासी विमलबाई पोखर्णा (वय ८८, सध्या रा.सौरभ कॉलनी, धूत शोरुममागे, नगर) यांचे ६ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शुभम फॅब्रिकेटर्सचे मालक संतोष पोखर्णा व भिंगार येथील विनोद मेडीकल्सचे विनोद पोखर्णा यांच्या त्या मातोश्री होत.

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा अन्यथा ९ ऑगस्टला नगरमध्ये सत्याग्रह आंदोलन करणार

जिल्हा रुग्णालयांमध्ये तपासणी न होताच शासनाच्या संकेतस्थळावर दिव्यांग प्रमाणपत्र कसे आली? : भारतीय जनसंसदेचा सवाल

नगर – राज्यात व देशात दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळा गाजत आहे. मात्र या घोटाळ्याची महाराष्ट्र शासन व केंद्र शासन देखील गांभीर्याने दखल घेताना दिसत नाही. ही खूप चिंताजनक बाब आहे. बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे अनेकांनी केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग, राज्य शासनाचे विविध विभाग यात नोकऱ्या, सवलती मिळवून मूळ दिव्यांग व्यक्तींवर खूप मोठा अन्याय केलेला आहे व शासन आणि समाजाची फसवणूक केली आहे. शासनाने गांभीर्याने विचार न केल्यास या प्रश्नावर राज्यभर जनआंदोलने उभे करणार आहोत. तसेच अहमदनगर जिल्हा रुग्णालयासमोर क्रांतिदिनी ९ ऑगस्ट रोजी सत्याग्रह आंदोलन सुरू करणार असल्याची माहिती भारतीय जनसंसदेचे जिल्हाअध्यक्ष सुधीर भद्रे यांनी दिली आहे.

राज्यात आणि देशात दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळा गाजत आहे. मात्र अहमदनगर जिल्ह्या रुग्णालयात व्यक्ती तपासणीसाठी आलेली नसताना‍ही शासनाच्या 'स्वावलंबन कार्ड' या संकेतस्थळावर युडीआयडी क्रमांक मिळवत काही व्यक्तींनी दिव्यांग प्रमाणपत्रे मिळवल्याचे प्रकरण नुकतेच जिल्हा रुग्णालयात उघडकीस आले आहे. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक साहेबराव डावरे यांनी गुन्हा दाखल करण्याचा आदेश वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिलेला आहे. तरीही जिल्हा रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल केलेला नाही. जिल्हा रुग्णालयांमध्ये तपासणी न होताच शासनाच्या संकेतस्थळावर दिव्यांग प्रमाणपत्रे कशी आली? ही गंभीर बाब आहे याबाबत गुन्हा दाखल होऊन अहमदनगर जिल्हा रुग्णालयाची तातडीने सायबर पथकामार्फत चौकशी व्हावी. रुग्णालयामध्ये व्यक्तींची तपासणी न करता परस्पर शासनाच्या स्वावलंबन कार्ड या संकेतस्थळा वरुन दिव्यांग प्रमाणपत्र मिळाले, त्या दिव्यांगांची नोंदणी संबंधित शासकीय रुग्णालयामध्ये आहे का? त्यांच्या वैद्यकीय तपासण्या अभिलेख या रुग्णालयामध्ये आहेत का तसेच मागील २५ वर्षाच्या कालावधीतील हे अभिलेख तपासले जावे अशी मागणी भारतीय जनसंसदेच्यावतीने करण्यात आली आहे. अन्यथा ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनी जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय येथे सत्याग्रह आंदोलन करणार असल्याचा इशारा भारतीय जनसंसदेचे जिल्हा अध्यक्ष सुधिर भद्रे, अशोक सब्बन व अर्शद शेख यांनी दिला आहे.

बोगस प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा या मागणीचे निवेदन जिल्हा शल्य चिकित्सकांना देताना भारतीय जनसंसदेचे पदाधिकारी.

यावेळी अशोक भोसले, पोपट साठे, सुनील टाक, बाळासाहेब पालवे, वीरबहादुर प्रजापती, अशोक डाके, जसवंतसिंह परदेशी, राम धोत्रे, प्रकाश गोसावी, कैलास पठारे आदी उपस्थित होते.

देवदर्शनासाठी गेलेल्या कुटुंबाचे घर चोरट्यांनी रात्रीच्यावेळी फोडत दागिने व रोकड पळविली

नगर – नगर तालुक्यातील वाळकी परिसरात चोरट्यांचा उपद्रव वाढतच चालला आहे. मागील आठवड्यात झालेल्या चोरीच्या घटने पाठोपाठ पुन्हा सोमवारी (दि.५)पहाटे दीड वाजेच्या सुमारास भोलेनाथ वाडी येथील माजी ग्रामपंचायत सदस्य किशोर भालसिंग यांच्या बंद घराचा दरवाजा तोडून सोन्याच्या दागिन्यांसह रोकड चोरट्यांनी पळवली. भालसिंग हे कुटुंबासह देवदर्शनासाठी गेलेले असताना चोरट्यांनी डाव साधला आहे.

किशोर भालसिंग हे सहकुटुंब देवदर्शनासाठी गेलेले आहेत. याचाच फायदा घेत चोरट्यांनी सोमवारी (दि.५) पहाटे दीडच्या सुमारास बंद असलेल्या घराचे कुलुप तोडून घरात प्रवेश करत कपाट फोडले. कपाटात उचकापाचक केली. चोरट्यांच्या हाती सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम लागली. आणखी काही हाती लागते का यासाठी घरातील डबे उचकत असताना डब्यांचा आवाज झाल्याने शेजारीच असलेले छावा ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राम भालसिंग जागे झाले. त्यांनी फोन करून शेजाऱ्यांना जागे केले. मात्र चोरट्यांनी शेजारील घरांना बाहेरून कडया लावल्याने त्यांना घराबाहेर पडता आले नाही.वस्तीवरील नागरिक जागे झाल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी तेथून पळ काढला. घर मालक आल्यानंतर किती माल चोरीला गेला याबाबतचा तपशील कळेल. रात्र गस्तीवर असलेल्या पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



वाळकी गावात भोलेनाथ वाडी परिसरात चोरट्यांनी घर फोडून केलेली उचकापाचक.

दरम्यान वाळकी परिसरात काही दिवस कमी झालेला चोरट्यांचा उपद्रव पुन्हा एकदा सुरु झाला आहे. आठवड्या पूर्वी वाळकीत देशी दारुचे दुकान, दवाखाना चोरट्यांनी फोडला होता. त्यानंतर पुन्हा वाळकीत घर फोडीची घटना घडली. चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलीसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

गृहिणी

आरोग्य

ॲसिडीटी टाळण्यासाठी

मानसिक ताण, काळजी यांमुळे ॲसिडीटी वाढते, त्याकरिता या गोष्टींवर नियंत्रण मिळवण्यासाठी मेडिटेशन, रिलॅक्सेशन टेक्निक्स करावे. जागरण टाळावे. किमान साडेसहा ते सात तास झोप घेणे आवश्यक असते.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय एस्पिरीन, सांधेदुखीची औषधे, पेनकिलर्स परस्पर घेऊ नयेत. घाईगडबडीने जेवल्याने अपचन, ॲसिडीटी असे त्रास होतात.

पाककला

दह्यातली तिखट बुंदी

साहित्य : ताजे दही एक वाटीभर, बुंदी दोन वाटी, चवीपुरते तिखटपूड, मिरपूड व जिरेपूड, चिरलेली थोडी कोथिंबीर.

कृति : दही तसेच पाणी न टाकता घुसळून बाऊलमध्ये ठेवा. बुंदी थोडा वेळ पाण्यात ठेवून काढा. तळहाताने दाबून त्यातील पाणी काढून बुंदी दह्यात टाका. त्यावर मसालेपूड व मीठ टाकून चांगले कालवा. त्यावर चिरलेली कोथिंबीर पसरून टाका.

सल्ला

विंचू डसल्यास काय करावे?

* विंचू डसल्यास डसलेल्या जागी अत्तर लावा. मध, तूप व चुना समप्रमाणात एकत्र मिसळून लावल्यास विष उतरेल.

* भाज्या चिरण्यापूर्वी धुऊन घ्याव्यात. यामुळे त्यातील खनिजे व व्हिटॅमिन नष्ट होत नाहीत.

* पदार्थ नेहमी मंद आचेवरच शिजवावेत. यामुळे मसाल्यांचा सुगंध टिकून राहातो. पौष्टिक घटक नष्ट होत नाहीत व भाजी स्वादिष्ट होते.

वास्तू

* मुलांची स्टडी किंवा बेडरूममध्ये पूर्वेकडे 'मनिप्लँट' लावावा. शिक्षणात हमखास यश मिळते.

* मुख्य दरवाजानुसार विजेचा किंवा सिमेंटचा खांब असणेही अशुभ आहे.

सौंदर्य

बोटांवरील सांधे काळे पडले असतील, तर त्यावर लिंबाच्या फोडीवर मीठ लावून चोळावे असे नियमित केल्यास काळेपणा नाहीसा होतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

बुधवार, दि. ७ ऑगस्ट २०२४

---. शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष
पूर्वा २१।३१, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : आजचा दिवस आपल्या सहकाऱ्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

वृषभ : बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यावाहीत खोळंबा निर्माण करू शकते. मागील उधारी बुडेल.

मिथुन : आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील.

कर्क : आपल्या आर्थिक मुद्दयांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल.

सिंह : मुलांसाठी आणि पत्नीसाठी वेळ द्याल. नातेवाईक त्रास देतील.

कन्या : आनंदाची बातमी मिळेल. मानसन्मानात वाढ होईल.

तूळ : पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास मिळेल.

वृश्चिक : आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील.

धनु : मागील उधारी व उसनवारी वसुल होईल.

मकर : वाहने व उपकरणे चोरी जातील. दिवस चांगला जाणार नाही.

कुंभ : कामात वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. जुने मित्र मनस्तात देतील.

मीन : व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण करणे धोक्याचे ठरेल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षिका – जो माझ्या प्रश्नाचे लवकर उत्तर देईल त्याला आज माझ्याकडून सुट्टी मिळेल..!
गण्याने लगेच आपली बॅग वर्गाबाहेर फेकली
शिक्षिका – ती बॅग कोणी फेकली?
गण्या – मी आता घरी जाऊ का?

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

ज्याच्या शक्त्यात नम्रता आहे
तोच खरोखर नाव कमवतो
तसाच जो गर्व व प्रतिष्ठा
यापासून दूर असतो तो



मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
भिंगार मो. ९४०३७३४२८१

शब्दगंध क्र. ६९८३

सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) सरकारने जिल्ह्यासाठी नेमलेला मुख्य कारभारी ४) सरळसोट लांब लाकूड किंवा बांबू ६) त्रास; परेशानी; दुःख ८) खोदण्याचे किंवा कांडण्याचे एक हत्यार ९) ओझे; पेंढी १०) सायंकाळ; संध्याकाळ १२) सहा तोंडांचा; कार्तिकेय १५) ओलसर; आंबटओले १६) पश्चिम दिशा २०) नुसते एकासारखे बोलणारा २१) यावर्थी

उभे शब्द :- १) एक स्थानिक स्वराज्य संस्था २) निषेध; तिरस्कार ३) रिवाज; पद्धत; चाल; तऱ्हा ४) राम यणातील किष्किंधा नगरीचा वानर राजा; सुग्रीवाचा भाऊ ५) स्वच्छ; नीट ॲग्रिमेंट ७) तराव; निश्चय १०) ऐकण्याचे इंद्रिय ११) भुतांचा राजा १३) थाटमाट; रुबाब १४) नाटक, चित्रपटात भूमिका करणारा १७) अंगीकारलेले व्रत १८) तीन वेळा १९) महादेवाचे उपासक

शब्दगंध क्र. ६९८२ चे उत्तर

व	र्ष	त	■	अ	ली	भा	ज	■
सा	ला	प	■	रा	क	■	प	■
प	■	क	ल	■	आ	व	■	प
■	■	■	ढ	ग्या	■	■	■	■
पा	क	घू	क	■	ह	वा	■	■
■	■	र	■	उ	ध	■	■	■
भा	र	■	दा	खा	ला	■	खा	■
■	■	■	■	■	■	■	■	■

मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : मौन म्हणजे आपल्या पवित्रमय विचारांचे मंदिर आहे.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

निर्जंतुकीकरण म्हणजे काय?

तुम्हाला माहीतच आहे की जीवजंतू साध्या डोळ्याने दिसत नाहीत. सुईच्या टोकावर लेहीत लक्षावधी जीवजंतू असू शकतात. या जीवजंतूंपैकी काही विषाणू वा जिवाणुंमुळे आपापल्या रोग होण्याची शक्यता असते. एखाद्या पृष्ठभागावरचे सर्व जंतू नष्ट करण्याच्या प्रक्रियेला जंतूनाशन असे म्हणतात. मात्र यात कोषाच्या स्वरूपात कही जिवाणू जिवंत राहतात. निर्जंतुकीकरणात मात्र जीवजंतू कोणत्याच अवस्थेत जिवंत राहत नाहीत. शस्त्रक्रियेसाठी वापरली जाणारी साधने, शस्त्रक्रिया करण्याचे टेबल, शस्त्रक्रियागार हे सर्व निर्जंतुक करून घ्यावे लागते. तसेच ज्या भागावर शस्त्रक्रिया करावयाची तेथील त्वचेचे देखील जंतूनाशक करावे लागते. निर्जंतुकीकरण वा जंतूनाशनाच्या अनेक पद्धती आहेत. मूलतः या दोहोंच्या उपयोग रुग्णास जंतूसंसर्ग होऊ नये हाच असतो. वस्तू उकळणे, वाफारणे, उन्हात ठेवणे, जाळणे, हत्यारे १० ते १५ मिनीटे पाण्यात उकळणे, कपडे कडक उन्हात वाळवणे, रोग्याची थुंकी जाळणे आदी प्रकारांत उष्णतेचा वापर करून जंतूनाशक केले जाते. डेटॉल, फेनॉल, आयोडिन, चुनकळी, तीव्र आम्ले, स्पिरीट यांसारखे रासायनिक पदार्थ वापरूनही निर्जंतुकीकरण करता येते. अतीनील किरणे वापरून ही आजकाल अन्नपदार्थ व वैद्यकीय साधने यांचे निर्जंतुकीकरण केले जाते. निर्जंतुकीकरणाची सुरुवात सेमेलवील आणि लीस्टर या शास्त्रज्ञांनी केली. पूर्वी शस्त्रक्रियेनंतर कित्येक रुग्ण जंतूसंसर्गामुळे मरत असत. म्हणजे रोग बरा पण शस्त्रक्रिया नको; असे म्हणायची पाळी रुग्णांवर यायची. कार्बोलीक ॲसीडचा वापर करून लीस्टरने जंतूसंसर्गाचे प्रमाण बरेचसे कमी केले. तेव्हापासून आजपर्यंत विविध प्रकारची जंतूनाशके व निर्जंतुकीकरणाच्या अनेक प्रभावी पद्धती उपलब्ध झाल्या आहेत. या सर्वामुळे रुग्णाला जंतूसंसर्ग होण्याचे प्रमाण बरेच कमी झाले आहे व शस्त्रक्रिया खूपच निर्धोक झाल्या आहेत. निर्जंतुकीकरण हे आपल्यासाठी वरदानच ठरले आहे.

लोभी बाई

एकदा एका गावात एक लहानशे तळे होते. त्या तळ्यामध्ये एक इसींण राहायची. त्या इसिंणीचे पीस सोन्याचे होते. त्या तळाच्या जवळच एक बाई आपल्या दोन मुलींना घेऊन राहायची. ती बाई फार गरीब होती. तिचे आयुष्य फार कष्टाने चालले होते.

एके दिवशी ती इसिंणी विचार करते की जर आपण या आपल्या पिसांमधून काही पीस त्या बाईला दिले तर त्या बाईचे सर्व कष्ट दूर होतील. असा विचार करून ती इसिंणी त्या बाईच्या झोपडीत जाते आणि तिला मदत करण्याचं सांगते. त्यानंतर ती इसिंणी त्या बाईची दरराेज एक एक सोनेरी पीस देऊन मदत करायची. इसिंणीने अशा प्रकारे मदत करून त्या बाईचे सर्व दुःख दूर केले. आता ती बाई आणि तिच्या मुली आनंदाने राहू लागल्या.

बघता-बघता काळ सरला आता ती बाई फार श्रीमंत झाली. एके दिवशी त्या बाईच्या मनात लोभ आला. तिने विचार केला की जर आपण त्या इसिंणीचे सर्व पिसे काढले तर आपण अजून श्रीमंत बनू. असा विचार करून ती बाई दुसऱ्या दिवशी त्या इसिंणीला पकडते आणि तिचे सर्व पिसे ओढू लागते. ती बघते तर काय, त्या इसिंणीचे ते सोनेरी पिसे आपला रंग बदलतात आणि सामान्य होऊन जातात. ते बघून त्या बाईला आश्चर्याचा धक्का बसला. इसिंणीने तिला बघितले आणि म्हणाली की मी तुला मदत करायची ठरवली आणि तशी केली देखील. पण आता तुझ्या मनात लोभ आला आहे, त्यामुळे आता मी तुझी काहीच मदत करणार नाही. मी इथून जात आहे कधीही परत न येण्यासाठी. असे म्हणून ती इसिंणी उडून जाते. त्या बाईला आपल्या केलेल्या चुकीची जाणीव होते पण आता पश्चाताप करून काय होणार, इसिंणी निघून जाते कायमची. पुन्हा कधीही न येण्यासाठी. त्या बाईने अति लोभ केला म्हणून तिला आपले सर्व काही गमवावे लागले.

तात्पर्य – अति लोभ करणे टाळावे.

जीवन चक्र

यावेळी म्हणजे वर्ष १९७७ मध्ये सेनाच्या प्रमुखाने एक आदेश जाहिर केला.

मधून कोणीही बुद्धीजीवी व्यक्तीने देश सोडून बाहेर जाऊ नये. ज्याने जाण्याचा प्रयत्न केला त्याला परत पाठवण्यात यावे. या कठिण परिस्थितीत कृपालसिंहजी महाराज यांचे वचन आठवले की, आपला गुरू पूर्ण आहे आपण शत्रूच्या घेऱ्यात अडकलो असलो तरी तुम्ही निडर रहा. मी माझ्या अर्धा विश्वासाची परिक्षा घेण्यासाठी काही साहस केले. ऐकरा विमानतळावर पोहचल्यावर कासंदर दिसणाऱ्या शिपायाने माझ्याकडून माझा पासपोर्ट हिसकावला आणि पासपोर्ट पायला सुरुवात केली. त्याला असे आढळले की मी व्यवसायाने वकील आहे. त्याने विचारले तुम्हाला माहित नाही का वकिलांना घाना सोडून बाहेर जाण्याची परवानगी नाही?

मला दरदरून घाम सुटला आणि मी संतदर्शनसिंहजी महाराज यांचे स्मरण केले. ज्यांनी मला भारतात येण्यासाठी आमंत्रित केले होते. माझ्या पासपोर्टचे पाने उलटतांना त्या शिपाईची नजर बाबा सावनसिंहजी महाराज, संत कृपालसिहजी महाराज, संत दर्शनसिंहजी महाराज यांच्या फोटोवर पडली जे पासपोर्ट मध्ये मी सजवून ठेवले होते. काही वेळ त्याने त्या फोटोंवर आपली नजर खिळवून ठेवली नंतर हसत त्याने विचारले, हे कोण आहेत? अशाप्रकारे बोलण्याची साखळी बदलली आणि आध्यात्मिक व उच्चश्रेणीचे महापुरूष यांच्याविषयी चर्चा चालू झाली. त्याचे वर्तन आता पुर्णपणे बदलले होते. आणि त्याने मला भारतातून काही आणण्यास सांगितले. मला स्वर्ग मिळाल्यासारखे वाटले आणि माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू येऊ लागले.

भारतात पोहचल्यावर संत दर्शनसिंहजी महाराज यांनी हसून माझे स्वागत केले आणि मिठी मारून मला पूर्णपणे आपले करून टाकले. मी त्यांना १९७४ मध्ये पाहिले होते आणि आता त्यांना पुर्णपणे नव्या अंदाजात आणि नव्या व्यक्तिमत्त्वात पाहिले. महाराज कृपालसिंहजी यांच्या उत्तराधिकारी विषयी जे संदेह होते ते असे नाहिसे झाले जसे की, कापूस वादळात उडून जाते. त्यांच्या सोबत मी तीन महिन्यांच्या प्रवासात पूर्ण आनंदी अवस्थेत राहिलो.

एका पुर्ण महापुरूषासोबत अनंताच्या त्या क्षणात राहून वेळ कसा काय व्यतित झाला ते कळलेच नाही. ज्या प्रकारे प्रत्येक वस्तूचा शेवट निश्चित आहे त्याच प्रकारे भारत सोडून जाण्याची माझी पण वेळ आली आणि त्यांनी मला घानाच्या सर्व सत्संगीना महाराजांचे प्रेम देण्यास सांगितले. त्यांच्या अपार दया मेहरने माझ्या घरी थोडासा सत्संग सुरू झाला.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

मैं जानता था कि यह कोई भ्रम नहीं है, कल्पना नहीं है या कोई सम्मोहन क्रिया नहीं है। उनके हाव-भाव, बातचीत, दृष्टि-व्यवहार, योगिक वायब्रेशन्स- ये सब देखकर मैंने तसल्ही कर ली कि मैं सही स्थान पर आया हूँ और मैंने सही रास्ता चुना है।।

उनकी बहुत वण्डरफुल पर्सनालिटी थी।

भाई साहब की बहूत वण्डरफुल पर्सनालिटी (विचित्र व्यक्तित्व) थी, यह सिर्फ मेरा अनुभव नहीं है, उनके सम्बन्ध-सम्पर्क में जो भी आते थे। उनको विशेष अनुभव होता था और पास आने से ही उनके जीवन में एक अनोखा परिवर्तन आ जाता था। उनके सामने जानेवाले की दृष्टि-वृत्ति, सम्बन्ध-सम्पर्क, आचार-विचार सब बदल जाते थे। बाबा कहना फॉलो फादर, फॉलो अनन्य बच्चे! भाई साहब को पहली बार देखो में बहूत प्रभावित हो गया। उसके बाद दादी प्रकाशमणि जी से तो उनकी बड़ी वण्डरफुल और प्रेरणादायी पर्सनालिटी थी। उसके में सम्पर्क में आया दादी जानकी जी, दादी गुलजार जी, दादी मोर इन्द्रा जी, दादी हृदयपुष्पा जी, दादी चन्द्रमणि जी के वाह! ये भगवान के वण्डरफुल सैम्पल्स हैं, उनकी सर्वश्रेष्ठ रचना हैं। इनको देखना, इनको मिलना, इनके साथ बातचीत करना- बड़ी भाग्य की बात है।

ज्ञानमार्ग का लक्ष्य बहूत उँचा है। यहाँ अन्त तक पढ़ना है, अन्त तक पुरुषार्थ करना है, अन्त तक सेवा करनी है। तब जाकर सम्पूर्ण बनना है। सम्पूर्णता के हमारे सामने सैम्पल्स हैं ये सब वरिष्ठ। उनमें जगदीश भाई साहब भी एक थे और अनोखे थे।

उनकी आवाज़, उनके वायब्रेशन्स, उनका हँसाने का तरीका ये सब उनके पास खींचकर ले जाते थे

जैसे-जैसे इस ज्ञान में आगे बढ़ने लगा, भाई साहब के नज़दीक जाने लगा, उनके साथ सेवा करने के, उनसे ज्ञानचर्चा करने के मौके मिलने लगे। ज्ञान में चलने के बाद भी मैं 'परमात्मा सर्वव्यापी है'- यह मानकर चलता था क्योंकि भक्तिमार्ग में भगवान को सर्वव्यापी मानते हैं। कोर्स के बाद भी मेरा मन परमात्मा सर्वव्यापी नहीं है- यह मानने के लिए तैयार नहीं था। जब भाई साहब के सम्पर्क में आया, तब उनसे यह प्रश्न पूछा कि परमात्मा कैसे सर्वव्यापी नहीं है? भाई साहब का समझाने का तरीका बड़ा वण्डरफुल था। उन्होंने इतनी आसानी से सिद्ध करके बताया कि मुझे मानने में और निश्चय करने में देर नहीं लगी। उन्होंने कहा, भगवान हमारा बाप है ना, टीचर और सद्गुरु है ना! तो बाप कभी सर्वव्यापी होता है क्या? टीचर सर्वव्यापी है तो वो हमें सिखायेगा कैसे? इस प्रकार, छोटी-छोटी बातों का मिसाल देकर उन्होंने मुझे समझाया और ज्ञान में निश्चय बिठाया।

भाई साहब से ज्ञान सुनने का जब स्वाद लग गया तो मैं छोटी-छोटी बातें पूछने के बहाने से बार-बार उनके पास जाने लगा । उनकी आवाज, उनके पास के वायब्रेशन्स, उनका हँसाने का तरीका ये सब मुझे उनके पास खींचकर ले जाते थे ।

शुरू-शुरू में भाई साहब ने सब-कुछ किया। जब वहाँ सेवा स्थिर हो गयी, सब प्रबन्ध हो गये तब भाई साहब किनारे हो गये। कहने लगे, बड़ी दादी और दादी जानकी जैसे बाहें वैसे करें, मेरा काम अभी पूरा हो गया। आगे क्या करना है- वे जानें। आश्चर्य की बात थी कि दादी जी ने हमें यही कहा कि जगदीश भाई ने जिस तरीके से सेवा शुरू की है, उसी अनुसार आगे भी चलें। उन्होंने जो मार्ग प्रशस्त किया, आज तक उसी मार्ग पर रशिया में सेवा चल रही है।

भाई साहब रशिया आते थे विशेष कर ट्रेनिंग देने। सेवा के लिए वहाँ के ही भाई-बहनों को ट्रेनिंग देकर तैयार करते थे। जब पहली बार भाई साहब रशिया आये, उस समय लगभग १० टीचर्स को उन्होंने तैयार किया। अभी रशिया में लगभग ७० टीचर्स तैयार हुए हैं जो सेन्टर पर रहते हैं, सेन्टर भी ७० हैं। भाई साहब में दृढ़ता का गुण बहुत विशेष था विंग बनाने में भी उनको बहुत मेहनत लगी। सब विंग्स की रूपरेखा बनाना, उनके कोआर्डिनेटर्स, चेयरपर्सन्स, मेम्बर्स कौन-कौन होने चाहिएँ- इसका चयन करना बहुत मुश्किल काम था। ये सब उन्होंने किया।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

चिक म्हणजे एक प्रकारची नैसर्गिक रोग प्रतिकारक लसच असते. सरदी, पडसे, खोकला, जुलाब, पोलिओ, दमा, त्वचारोग यासारख्या रोगांपासून बाळाचे नैसर्गिकरीत्या संरक्षण चिकामुळे होते. चिकामुळे मलावरोध न होता बाळाचे पोट साफ होते म्हणून प्रत्येक आईने प्रथम येणारा चिक बाळाला पाजावा. मातेच्या दुधाचे मोल गायीच्या, शेळीच्या दुधाला येऊ शकत नाही. पहिले चार महिने तरी आईने बाळाला स्वतःचेच दूध पाजावे. त्यानंतर बाळाच्या विकासासाठी इतर पूरक आहाराबरोबर स्तनपान करावे.

नवजात बाळासाठी स्तनपानाचे प्रमाण :

नवजात बाळाला किती वेळा स्तनपान करावे याबद्दल मातेला संभ्रम असतो किंवा प्रश्न पडतो. त्यात स्त्री पहिल्यांदाच माता झाली असेल, तर तिला या गोष्टीची काहीच कल्पना नसते. बाळाला स्तनपान किती करावे याबद्दल सर्वांना लागू पडेल असा खरोखरच नियम नाही, परंतु साधारणतः दर २ ते ३ तासांनी बाळाला स्तनपान करावे. रात्री झोपल्यानंतर बाळ रडले किंवा जागे झाले, तर स्तनपान करावे. उगीचच उठवून अंगावर पाजू नये. प्रत्येक वेळी रडण्याचे कारण भूक आहे असे नसते. इतरही कारणांमुळे म्हणजेच आईच्या सहवासासाठी, आजारी असल्यास बाळ रडू शकते; त्यामुळे मातेने बाळाला भूक लागल्यामुळेच रडते आहे का हे बघून बाळास पाजावे. सुरुवातीला निर्माण होणारे दूध खूप असते. एवढे सगळे दूध बाळाला लागत नाही; त्यामुळे दोन्ही स्तनातून साधारणपणे ५ ते १० मिनिटे स्तनपान करावे व उरलेले दूध काढून टाकावे. स्तनात दूध जास्त प्रमाणात साचल्यामुळे गाठी निर्माण होण्याची शक्यता असते. जसेजसे बाळ मोठे होते तशी दूधाची आवश्यकता वाढते. अशा वेळेस बाळाचे पोट भरल्यावर ते स्वतःहून स्तन सोडते.

स्तनपानाची पध्दत :

स्तनपानातून बाळाची शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढ होण्याचे त्याचे पोषण होते. म्हणून स्तनपान हे केवळ शारीरिक क्रिया नसावी तर ती म नापासून प्रेमाने, केलेली क्रिया असावी. याकरिताच आईने खूप प्रेमाने शांत चित्ताने व प्रसन्न मनाने मुलाला पाजणे आवश्यक असते. मोठ्याने बोलत असताना किंवा रागावत असताना स्तनपान करू नये. घाईघाईने, रागारागाने 'स्तनपान हे एक काम' अशा भावनेने स्तनपान करू नये; यामुळे आईच्या दुधातून मिळणारे फायदे बाळाला मिळत नाही. स्तनपान करताना प्रथमतः स्तन व स्तनाग्रे कोम ट पाण्याने धुवून घ्यावीत व नंतर सुती कपड्याने पुसावीत.

(क्रमशः)

– डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

भगवंताचे नामस्मरणाने जीवनातील दुःख नाहिसें होतात

ह.भ.प. गोविंद महाराज चौधरी यांचे प्रतिपादन; माळीवाडा येथील सावता महाराज उत्सव समिती आयोजित सप्ताहाचा समारोप

नगर – भगवंतांची भक्ती हा मुक्तीचा मार्ग आहे, भगवंतांचे नामस्मरणाने जीवनातील दुःख नाहिसे होत असतात. त्यासाठी आपल्या संतांनी भक्तीचे अनेक मार्ग सांगितले आहेत, त्या मार्गाने आपण गेल्यास दुःख कमी होऊन जीवनात आनंद निर्माण होत असतो. ज्ञानेश्वरी पारायणाने आपणामध्ये एक अंतरिक उर्जा निर्माण होत असल्याने अशा सप्ताहांची आज खरी गरज आहे. त्यामुळे प्रत्येकाने पारायण केले पाहिजे. मनवंतापर्यंत पोहचण्याचा तो एक सोपा मार्ग आहे, असे मौलीक विचार ह.भ.प. गोविंद महाराज चौधरी यांनी केले.

माळीवाडा येथे श्री सावता महाराज उत्सव समिती आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोपप्रसंगी बोलताना ह.भ.प. गोविंद महाराज चौधरी

माळीवाडा येथे श्री सावता महाराज उत्सव समिती आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या समारोपप्रसंगी माळीवाडा येथे श्री सावता महाराज उत्सव समिती आयोजित सप्ताहाच्या सांगतेप्रसंगी ह.भ.प. गोविंद महाराज चौधरी यांनी केले. त्यास अहमदनगर शहर व उपनगरातील नागरिकांकडून प्रतिसाद मिळत आहे. या मोहीमेच्या तिसऱ्या रविवारी महापालिकेच्या वतीने नालेगाव परिसरात झिका, डेंग्यू आदी विषाणूजन्य आजारांचा रोखण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली.

या मोहिमेत आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वतः सहभागी होऊन नागरिकांना डास उत्पत्ती करणारी स्थाने नष्ट करण्याचे आवाहन केले. घर परिसराजवळ कोणत्याही ठिकाणी साचलेले पाणी वाहते करुन द्यावे, फ्रिजचे ट्रे, कुंडया, पक्षांसाठी ठेवलेले पाण्याचे भांडे, जुने टायर, भंगार वस्तू यामध्ये साचलेल्या पाण्यात एडीस डासांची उत्पत्ती होऊन विषाणूजन्य आजार पसरतात. त्यामुळे सदरचे पाणी तात्काळ वाहते करावे, संतुलित आहार घ्यावा, लहान मुलांना पूर्ण बाह्यांचे कपडे घालावेत, झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

यावेळी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती गणेश कवडे. मनपा आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, विकास गीते, सतीश ताठे आदिसह महाप्मा पांडुरंग नन्नवरे, नितीन पुंड, बजरंग भुतारे अमोल धाडगे, नितीन शेरकर, रमेश बनकर, विशाल पटवेकर, शन्कर वाघमारे, विनायक आंबेकर आदि उपस्थित होते.

व्यप्रसंगी छबुनाना जाधव म्हणाले, संत–महात्म्यांचे विचार हे आपल्या जीवनात महत्वाचे आहे. त्यासाठी दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून भक्तीयोग साधण्याचा प्रयत्न करत असतो. सप्ताहांतर्गत नामवंत किर्तनकारांची कीर्तन सेवा गेल्या सप्ताहभर आयोजित कार्यक्रमातून भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

गेल्या सप्ताहभरापासून सुरु असलेल्या पारायण सोहळा, हरीपाठ, भजन आदींनी परिसरात चैतन्य निर्माण झाले होते. दरवर्षी आयोजित केलेल्या सप्ताहास प्रतिसाद वाढत आहे ही आमचे भाग्यच म्हणावे लागेल. काल्याच्या किर्तनानंतर माळीवाडा पंच मंडळ देवस्थानच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा असंख्य भाविकांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील त्रिपाठी यांनी केले. यावेळी ह.भ.प. जालिंदर महाराज निकम, ह.भ.प. बाळकृष्ण महाराज खेरे, ह.भ.प. विश्वभर महाराज वाळके, बालयोगी अमोल महाराज जाधव, प्रभालाई भोंग, शैलजा मुळे, नवले, सुनीता बोराटे, ताराबाई मोकाटे, मंगलताई लंडकर, विकास पटवेकर, दिंडे, सतीश म्हस्के, शरद पाफेकर, विलास ओसरगव, गणेश आंबेकर, प्रसाद कोके, गणेश सोमवंशी, उज्वला शेरकर, आदि सह विविध महिला भजनी मंडळ आदींचे या सहकार्य मिळाले.

सप्ताह यशस्वी करण्यासाठी उत्सव समिती, युवक मंडळ, महिला मंडळ, माळीवाडा पंचमंडळ आदींचे सहकार्य मिळाले.

आंतरराष्ट्रीय युनिव्हर्सिटीकडून नगर येथील मुनव्वर हुसेन यांना ऑनररी डॉक्टरेट प्रदान

नगर – थिओफेनी इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, हैती व वर्ल्ड असोसिएशन ऑफ रायटर्स पोएट्स अँड आर्टिस्ट्स, पेस आणि यब्रा स्कॉलर्स अँड फेलो युनिव्हर्सिटी फिलीपीन या अंतरराष्ट्रीय युनिव्हर्सिटीच्या संयुक्त विद्यमाने मुनव्वर हुसेन छोटे खान यांना ऑनररी डॉक्टरेटची पदवी ४ ऑगस्ट रोजी अमरावती येथे प्रदान करण्यात आली.

मुनव्वर हुसेन यांना आंतरराष्ट्रीय युनिव्हर्सिटीकडून ऑनररी डॉक्टरेट पदवी अमरावती येथे युगांडाचे जी. एम. चान्सलर.

यावेळी युगांडाचे जी.एम. चांसलर डॉ. अब्दुल अकील सर, निमेशन कॉलेज ऑफ अमरावतीचे डायरेक्टर विजय राऊत, नांदेडचे सिव्हील सर्जन आफ गर्वन्मेंट हास्पिटल डॉ.मोहम्मद मिलानी, डॉ.बी.जी.खोब्रागडे, डॉ.नरेंद्र गुलदेवकर उपस्थित होते.

मुनव्वर हुसेन हे प्रसिध्द उर्दू कवी आहे. व त्यांनी त्यांचे आजोबा हिम्मत अहमदनगरीची सुफी काव्य रचनावर आधारित पुस्तक नुरुल हुदा २०१६ प्रकाशित केली होती व तसेय त्यांनी डॉ. असलम मिर्जाची रेतिहासिक पुस्तक निजाम शाही तोपसाज रुमी खानचा हिंदीमध्ये अनुवाद केला आहे. मुनव्वर हुसेनची गज़ल वर आधारित पुस्तक लवकरच प्रकाशित होणार आहे.

मुनव्वर हुसेन अहमदनगर उर्दू हायस्कूल (मिसगर लायब्रेरी) मध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असुन मुनव्वर हुसेन शिक्षक कर्मचारी संघ भारत, अहमदनगरचे अध्यक्ष आहे व तसेच शिक्षक भारती उर्दू संघटना अहमदनगरचे सचिव आहे व गुफ्तगू, या साहित्यीक संस्था, प्रयागराजतर्फे आधुनिक भारताचे गजलकार फिराक गोरखपुरी अॅवॉर्ड २०२२ मध्ये मिळाले व २०२३ मध्ये गालिब अॅकेडमी दिल्ली येथे राष्ट्रीय भाषा शिक्षक पुरस्कार देखील मिळाला आहे.

नेत्री ग्रामस्थांच्या वतीने फुले यांचा सन्मान

नगर तालुक्यातील नेत्री येथील रामदास विठोबा फुले यांचे सामाजिक कार्यात २६ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करून सत्कार करण्यात आला. फुले हे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे ते तालुकाध्यक्ष असून समता परिषदेच्या माध्यमातून सुरू असलेल्या चळवळीत ते मोठे योगदान देत आहेत. स्वच्छ भारत अभियान, रुक्दान, वृक्षारोपण तसेच सर्वरोग आरोग्य शिबिरातून त्यांचे कार्य सुरू आहे. त्यांच्या कार्याची दखल घेउन नानासाहेब बेल्हेकर यांनी पुढाकार घेउन रामदास फुले यांचा ग्रामस्थांच्या वतीने माजी सरपंच संजय आसारान जपकर यांच्या हस्ते सन्मान करून सत्कार केला.

प्रा. उज्वला धस यांचे सेट परीक्षेत यश

नगर – येथील प्राध्यापिका उज्वला सुनिल धस–आंबेडकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत यश संपादन केले आहे. त्या शिक्षणशास्त्र या विषयात उत्तीर्ण झाल्या आहेत. त्या आडसुळ बी.एड. कॉलेजमध्ये सहाय्यक प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत.

त्यांना प्रा.डॉ. गोकुळ मोरे आणि पत्नी प्रा. सुनिल धस यांचे मार्गदर्शन लाभले.

डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेची जनजागृती

उपाययोजनांची आयुक्त यशवंत डांगे यांनी केली पाहणी

नगर – पावसाळ्यात उद्भवणारे विषाणूजन्य आजार रोखण्यासाठी दर रविवारी एक तास स्वच्छतेसाठी असे आवाहन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले होते. त्यास अहमदनगर शहर व उपनगरातील नागरिकांकडून प्रतिसाद मिळत आहे. या मोहीमेच्या तिसऱ्या रविवारी महापालिकेच्या वतीने नालेगाव परिसरात झिका, डेंग्यू आदी विषाणूजन्य आजारांचा रोखण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली.

डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेची जनजागृती मोहिमेअंतर्गत नालेगाव भागात मनपा आयुक्त यशवंत डांगे पाहणी करताना. (छाया – लहू दळवी)

या मोहिमेत आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वतः सहभागी होऊन नागरिकांना डास उत्पत्ती करणारी स्थाने नष्ट करण्याचे आवाहन केले. घर परिसराजवळ कोणत्याही ठिकाणी साचलेले पाणी वाहते करुन द्यावे, फ्रिजचे ट्रे, कुंडया, पक्षांसाठी ठेवलेले पाण्याचे भांडे, जुने टायर, भंगार वस्तू यामध्ये साचलेल्या पाण्यात एडीस डासांची उत्पत्ती होऊन विषाणूजन्य आजार पसरतात. त्यामुळे सदरचे पाणी तात्काळ वाहते करावे, संतुलित आहार घ्यावा, लहान मुलांना पूर्ण बाह्यांचे कपडे घालावेत, झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

यावेळी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती गणेश कवडे. मनपा आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, विकास गीते, सतीश ताठे आदिसह महाप्मा फुले आरोग्य केंद्राचे डॉक्टर कर्मचारी अंगणवाडी, आशा सेविका उपस्थित होत्या.

जनजागृती मोहिमेदरम्यान गणेश कवडे म्हणाले की, पावसाळ्यात अनेक विषाणूजन्य आजार पसरत असतात. ताप येणे, थंडी वाजून येणे, अंगदुखी, डेंग्यू आदी आजारांना रोखण्यासाठी महापालिका प्रशासन आवश्यक त्या सर्व खबरदारीच्या उपायोजना करीत आहे. औषध व धूर फवारणीचे नियोजन करण्यात येत आहे. यासाठी नागरिकांचे सहकार्य देखील अपेक्षित असून त्यांनीदेखील त्याबाबतच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे असे आवाहन केले.

जनजागृतीसाठी मनपा आयुक्त यशवंत डांगे नागरिकांच्या घरोघरी

अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने शहरात डेंग्यू मुक्त शहर अभियानानिमित्त जनजागृती मोहीम सुरू केले आहे. यानिमित्त कर्मचारी नागरिकांच्या घरोघरी जाऊन माहिती देत तपासणी करत आहे. या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्त यशवंत डांगे भर सकाळी नगर शहरामध्ये स्वच्छतेची माहिती घेत कर्मचाऱ्यांबरोबर डेंग्यू संदर्भात जनजागृती करत आहे. तसेच पाण्याचे साठे असलेल्या जागेची पाहणी करत आहे. व नागरिकांना माहिती देत संसर्गाजन्य आजारापासून वाचण्यासाठी आव्हान करत आहे.

चित्रकूट गुरूकुलमधील इव्हिनिंग क्लबचेही उद्घाटन करताना पोलिस उपअधीक्षक अमोल भारती. दुसऱ्या छायाचित्रात नर्सरी व युकेजीची मुले कलागुणांचा कार्यक्रम सादर करताना दिसत आहेत.

चित्रकूट गुरूकुलच्या चिमुरड्यांच्या सुंदर कलाविष्काराला उपस्थितांची दाद

इव्हिनिंग क्लबचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या हस्ते उद्घाटन

नगर – शाळा सुरु झाल्यानंतर महिन्याभरात मुलांना मिळालेले ज्ञान, त्यांनी आत्मसात केलेले कलागुण याचे सादरीकरण करण्यासाठी चित्रकूट गुरूकुलमध्ये विशेष कार्यक्रम पार पडला. नर्सरी ते युकेजीपर्यंतच्या मुलांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत कलागुण सादर केले. कविता वाचन, योगासने, गाणी, नृत्याविष्कार, कथाकथन अतिशय प्रभावीपणे सादर करून चिमुरड्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

याच कार्यक्रमात चित्रकूट गुरुकुलच्या इव्हिनिंग क्लबचेही उद्घाटन पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय चव्हाण, प्राचार्या सारिका आनंद यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते. शाळेच्या विविध उपक्रमांत मुलांसह सहभागी होणाऱ्या पालकांचाही यावेळी शाळेतर्फे सन्मान करण्यात आला.

पोलिस उपअधीक्षक अमोल भारती म्हणाले, चित्रकूट गुरुकुलमधील लहानग्यांचा कलाविष्कार पाहताना मनाला खूप आनंद झाला. मुलांमधील सुप्त कलागुणांना चांगल्या प्रकारे वाव देण्याचे काम याठिकाणी होत आहे. अशा प्रोत्साहनामुळेच मुले मोठेपणी आपले ध्येय गाठू शकतील. त्याचवेळी पालकांनीही मुलांचे संगोपन करताना त्यांच्यावर खूप अपेक्षांचे ओझे लादू नये. मुलांच्या कलाप्रमाणे त्यांना शिकू दिले पाहिजे. त्यामुळे मुलांचा नैसर्गिकरित्या सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.

प्राचार्या सारिका आनंद यांनी सांगितले की, चित्रकूट गुरुकुलमध्ये चिमुरड्यांचा कल लक्षात घेवून हसतखेळत शिक्षण देण्यावर भर दिला जातो. प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष दिले जाते. आता इव्हिनिंग क्लबव्दारे मुलांना हस्तकला, चित्रकला, हस्ताक्षर, मनोरंजनपर खेळ अशा विविध कार्यकृतीत सहभागी करून घेतले जाणार आहे. मुलांनी मोबाईलपेक्षा अधिकचा वेळ इतर चांगल्या गोष्टींसाठी द्यावा यासाठी हा क्लब सुरु करण्यात आला आहे. कार्यक्रमास विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.

व्यसनमुक्ती केंद्र काळाची गरज

विलास वागस्कर यांचे प्रतिपादन; भिंगार येथे आत्मशक्ती व्यसनमुक्ती केंद्राचे उद्घाटन

नगर – वाढत्या अपेक्षांच्या ओझ्यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे. करिअरच्या मागे धावण्यात अधिकाधिक वेळ जात असल्याने या पिढीच्या वैयक्तिक आयुष्यात बरीच हालचाल होताना दिसते. त्यामुळे हि पिढी कुठेतरी मानसिक आधार शोधण्यासाठी प्रयत्न करत आहे. हा मानसिक आधार कशातच मिळाला नाही तर ते व्यसनाच्या आहारी जातात आणि अनेक गोष्टी ते गमावुन बसतात त्यांना व्यसनापासून लांब ठेवण्यासाठी व्यसनमुक्ती केंद्र काळाची गरज असल्याचे प्रतिपादन विलास वागस्कर यांनी केले.

भिंगार येथील ई एम ई कॉलनीत आत्मशक्ती व्यसनमुक्ती केंद्राचे उद्घाटन करताना विलास वागस्कर.

नगर पाथर्डी रोड, भिंगार येथील ई एम ई कॉलनीत आत्मशक्ती व्यसनमुक्ती केंद्र याचे उद्घाटन विलास वागस्कर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सेंटरच्या अध्यक्षा सौ. सविता राहुल आडकर, सनी वागस्कर, कांबळे, संचालक राहुल आडकर उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. वागस्कर म्हणाले, परस्परांमध्ये होणारे मतभेद गरजांची अपूर्णता, शौक म्हणून व्यसन केलं जाते, पण कही काळानंतर हे व्यसन हे त्याच्या आयुष्यांचा अविभाज्य भाग बनतो. संपूर्णपणे व्यसनांच्या आहारी गेलेले आहेत त्यांची जाणीवही त्यांना होत नाही. आज खूपच कमी वयात व्यसनाधीन झालेली मुल आजकाल मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतात.

यावेळी प्रास्तविकात संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता आडकर म्हणल्या कि, व्यसनाधीनता खूप मोठी किंमत मोजून येते आणि आपण स्वतःला किंवा कोणालाही व्यसनाधीन होऊ न देण्यासाठी त्याचे हानिकारक परिणाम ओळखण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. म्हणुनच व्यसनाच्या आहारी गेलेल्यांना पुन्हा मुळ रुपात आणण्यासाठी आत्मशक्ती व्यसनमुक्ती केंद्राची सुरुवात करण्यात आल्याचे सांगितले. तसेच नाना खैरमोड, प्रमोद खैरमोड, स्वप्नील बावधनकर आणि योगेश महापुरे यांनी कार्यक्रमास सहकार्य केले.

श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त शिंपी समाजातील १० वी व १२ वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा डावरे गल्लीतील श्री नामदेव विठ्ठल मंदिरात सत्कार करताना हभप मिलिंद चवंडके महाराज आदी.

संत नामदेवांनी मध्ययुगीन कालखंडात वारकरी संप्रदायाची भगवी पताका प्रभावीपणे फडकवली

प्रवचनकार हभप मिलिंद चवंडके यांचे प्रतिपादन; श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नामसप्ताह सोहळ्याची सांगता

नगर – संत नामदेवांनी १२ व्या शतकात अभंगांमधून समाजप्रबोधन करत सामाजिक समरसता साधली. मध्ययुगीन सांस्कृतीक, धार्मिक, सामाजिक आणि पारमार्थिक इतिहासावर आपल्या अलौकीक धार्मीक कार्याची दिव्य भगवी पताका प्रभावीपणे फडकवत ठेवली, असे प्रतिपादन प्रवचनकार हभप मिलिंद चवंडके यांनी केले.

श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नामसप्ताह सोहळ्याची सांगता प्रवचनाने करताना ते बोलत होते. येथील डावरे गल्लीतील श्रीनामदेव विठ्ठल मंदिरात सालाबादप्रमाणे हा सोहळा भक्तीपूर्ण वातावरणात आला. मंदिराचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कवितकर यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष महेश जाधव, सचिव अभिजीत पाडळकर, सहसचिव मयुर नेवासकर, खजिनदार सुशित चांडवले, ज्ञानेश्वर पवार, प्रसाद मांढरे, दिगंबर हिरणवाळे, गणपत पंगुडवाले, दिलीप शहापूरकर, सौ. निर्मला होनराव यांच्यासह श्रोतृवृंद प्रवचनास उपस्थित होता.

डावरेगल्लीमधील श्री नामदेव विठ्ठल मंदिरात प्रवचन करताना प्रवचनकार हभप मिलिंद चवंडके महाराज.

श्री. चवंडके महाराज पुढे म्हणाले, नाथ संप्रदायाचा वारसा लाभलेल्या ज्ञानेश्वर माऊलींच्या सहवासाने प्रभावित होऊन नामदेव महाराजांनी वारकरी संप्रदायाची भगवी पताका खांद्यावर घेत भारत भ्रमण केले. थेट पंजाबपर्यंत जाऊन वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. संत ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिणारे ते आद्य चरित्रकार होत. साडेतीन हजारांहून अधिक अभंग लेखन केलेल्या नामदेव महाराजांचे अभंग हिंदी आणि पंजाबी भाषेतही आहेत. शीखांच्या ग्रंथ साहेब ग्रंथामध्ये नामदेवजींकी मुखबाणी या नावाने ६१ पद आहेत. नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी अशी साहित्य निर्मिती करत नामदेवांनी भक्तीचा प्रसार केला. अठरा पगड जातींना एकत्र करून सामाजिक समता निर्माण करण्यात योगदान दिले. समाजातील जातीभेद मिटवताना समाज परिवर्तनाचे रणशिंग फुंकले. ज्ञानेश्वरांसोबत काशीयात्रा करून पंढरपुरला आल्यावर विविध जाती धर्मातील लोकांना चंद्रभागेच्या वाळवंटात एकत्र बसवून जेवू घालत मावंदे केले.

चोखामेळा, गोरा कुंभार, सावता माळी, सेना न्हावी, कान्होपात्रा, जनाबाई, रोहिदास या संतमेळ्यात राहिलेल्या नामदेवांनी विरोधा खेचर हे अध्यात्मिक गुरु लाभले. अमृताहून गोड अभंग वाणीमधून त्यांनी तत्कालिन समाजातील बदलाचे चित्रण मांडले. संत नामदेवांच्या वाङ्मयीन कार्याने भारताला सांप्रदायिक जीवनाची एक दिशा मिळवून दिली. पंढरपुरातील विठ्ठलाचे दर्शन घेताना प्रथम नामदेव महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन घ्यावे लागते. येथील 'नामदेव पायरी' नामदेव महाराजांच्या अलौकीक कार्याची आठवण करून देते.

ज्ञानेश्वरांनी प्रवर्तीत केलेल्या मायावत धर्म प्रसाराचे महान कार्य नामदेवांनी केले. ज्ञानेश्वरांनी प्रतिपादन केलेले तत्वज्ञान नामदेवांनी आपल्या वाणीने सुबोध, रसाळ आणि मधुर बनविले. भक्तीचा मळा फुलवला. नामाला देवत्वाची प्रतिष्ठा मिळवून दिली.

नामदेवांच्या ज्ञान, कर्म आणि भक्ती या त्रिवेणी संगमात वारकरी संप्रदाय पावन झाला, हे सांगताना चवंडके महाराजांनी अभंगांचे दिलेले विविध दाखले भाविकांना भावले.

शिंपी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

नगर – श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ६७४ व्या संजीवन समाधी सोहळ्याचे औचित्य साधून नामदेव शिंपी समाजातील १० वी व १२ वि तील तसेच विशेष कला गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा श्री नामदेव विठ्ठल मंदिर ट्रस्ट, डावरे गल्ली येथे झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. चवंडके महाराज तसेच नीलकंठ देशमुख महाराज यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह, प्रशस्ती पत्रक आणि देशमुख महाराजांनी लिहिलेले पुस्तक देऊन करण्यात आला.

या प्रसंगी चवंडके महाराजांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुण प्राप्त करण्या बरोबरच देव, देश आणि धर्मा प्रति आपले कर्तव्य सुद्धा तितकेच महत्वाचे असल्याचे पटवून दिले, तसेच देशमुख महाराजांनी सुद्धा नियमित वाचनाचे फायदे आपल्या आयुष्यात किती महत्वाचे असते याचे महत्व पटवून दिले. या वेळी समाजाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कवितकर, उपाध्यक्ष महेश जाधव, सचिव अभिजीत पाडळकर सह सचिव मयूर नेवासकर, प्रसिद्धी प्रमुख प्रफुल्ल जवळकर, श्री नामदेव सांस्कृतिक महिला मंडळाच्या सदस्या, तसेच समाजाचे आजी माजी पदाधिकारी, विदयार्थी त्यांचे पालक तसेच समाज बंधु भगिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित पाडळकर यांनी केले.

महिला कर्मचारी संचलित तारकपूर शाखेचे कामकाज उत्कृष्ट

अमित मुथा यांचे प्रतिपादन; अहमदनगर मर्चंटस बँकेच्या तारकपूर शाखेचा १२ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

नगर – अहमदनगर मर्चंटस बँकेने सर्वोत्तम बँकिंग सेवा देऊन विश्वासाहर्ता मिळवली आहे. बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी अतिशय दूरदृष्टीने अनेक निर्णय घेऊन सहकारी बँकींगमध्ये अतुलनीय योगदान दिले. त्यांच्याच संकल्पनेतून तारकपूर शाखेचे संपूर्ण संचालन महिला अधिकारी, कर्मचारी करतात. महिला सक्षमीकरणासाठी राबवण्यात आलेले ही संकल्पना कमालीची यशस्वी ठरली आहे.

अहमदनगर मर्चंटस बँकेच्या तारकपूर शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट कामकाजाबद्दल शाखाधिकारी राजश्री अढ्ढेलवार यांचा सत्कार करताना व्हा. चेअरमन अमित मुथा, समवेत महिला कर्मचारी व संचालक.

या शाखेमध्ये लवकरच एटीएम सेवा सुरु करण्यात येणार असून रिसायकलर मशीन ही कार्यान्वित करण्यात येत. त्यामुळे बँकेच्या ग्राहकांना पैसेही भरता येतील. तसेच चेअँसर मशीनमुळे २४ बाय ७ पास बुक देखील प्रिंट आउट करुन मिळेल. बँकेच्या पुढील अद्ययावत सेवेसाठी खातेदारांनी एटीएम कार्ड व नवीन पासबुक बनवून घ्यावे असे आवाहन बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी केले.

अहमदनगर मर्चंटस बँकेच्या तारकपूर शाखेच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त शाखाधिकारी राजश्री अढ्ढेलवार व महिला स्टाफच्या अमित मुथा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुरवातीला श्री गणेशाच्या प्रतिमेची विधिवत पूजा व आरती करण्यात आली. तसेच वर्धापनदिना निमित्त केक कापण्यात आला.

याप्रसंगी संचालक संजय बोरा, किशोर मुनोत, सुभाष बायड, विजय कोथिंबीरे, स्टाफ संचालक प्रसाद गांधी, मुख्य.कार्य.अधिकारी सुनील पुराणिक, महेंद्र गंधे, शाखाधिकारी राजश्री विनोद अढ्ढेलवार यांच्यासह सभासद व ग्राहक उपस्थित होते.

मुख्य कार्य.अधिकारी सुनील पुराणिक यांनीही महिला स्टाफ बँकिंग क्षेत्रात देत असलेल्या चांगल्या सेवेचे कौतुक केले. ग्राहकांच्यावतीने इंद्रजित नय्यर यांनी शाखेच्या चांगल्या कार्याचा ऊल्लेख करून वापुढेही हे कार्य असेच बहरत राहो असे सांगून शुभेच्छा दिल्या.

शाखाधिकारी राजश्री अढ्ढेलवार स्वागत करताना सांगितले की, या शाखेमध्ये सुमारे ६७ कोटींच्या ठेवी असून सुमारे २७ कोटींचे कर्ज वितरण केलेले आहे. या शाखेला बँकेने दिलेले टार्गेटही आम्ही पूर्ण केली असून आम्हाला त्याचा अभिमान आहे असे सांगितले

शाखेच्या वतीने प्रातिनिधिक स्वरुपात ग्राहक गणेश आव्हाड, गुलशन कंत्रोड, राजेंद्र कंत्रोड, धीरज बोरा, सुरेश लोढा, नितू गांधी यांचा सन्मान करण्यात आला. मुख्य कार्य.अधिकारी सुनील पुराणिक यांनी आभार मानले.

योगी गेंडानाथजी महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ

नगरमध्ये २७ ऑगस्ट रोजी खुल्या जिल्हास्तरीय भक्तिगीत गायन स्पर्धा

नगर – नगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे महंत परमपूज्य योगी गेंडानाथजी महाराज यांच्या २६ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्ताने शहरात स्वरबहार फाऊंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय खुल्या भक्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १६ वर्षापासून पुढील स्पर्धक या स्पर्धेत भाग होवू शकणार आहेत.

२७ ऑगस्ट रोजी गुलमोहर रोडवरील कोहिनूर मंगल कार्यालयात या स्पर्धा होणार असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र टाक यांनी कळविले आहे. सकाळी ११ वा. या स्पर्धेत प्रारंभ होणार असून सायंकाळी लगेचच पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम होणार आहे.

एकूण ११ हजार रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करताना प्रथम क्रमांकाकरिता रू. ५१००, द्वितीय क्रमांक रू. ३१००, तृतीय क्रमांक रू. २१००, रोख व स्मृतीचिन्ह तर ५०० रुपयांची २ उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेतील प्रत्येक सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

स्पर्धेकरिता रू. ३०० प्रवेशशुल्क आकारण्यात येणार असून स्पर्धेकाने अभंग, भक्तिगीत, गवळण, हिंदी भजन आदी गीतप्रकारातील कुठलेही १ गीत सादर करावयाचे आहे. सादरीकरणासाठी एकूण ५ मिनिटे एवढा अवधी दिला जाणार आहे. साथ संगत सोबत आणल्यास उत्तम. नासल्यास संयोजकांच्या वतीने वाद्य आणि वादकांची व्यवस्था करण्यात आली आहे.

स्पर्धेकरिताचे प्रवेश अर्ज आर टी स्टुडिओ, कैलास टॉवर, आझाद चौक, घुमरे गल्ली, अ. नगर येथे उपलब्ध आहेत. अर्ज २५ ऑगस्ट पूर्वी जमा करावेत. अधिक माहितीकरिता राजेंद्र टाक मोबाईल नंबर ९४२२२२०८७५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

छावणी परिषद शाळेत वृक्षारोपण करताना उपवनसंरक्षक सुवर्णा माने, डॉ.उद्धव शिंदे, संजय शिंदे, राजू भोसले.

शुद्ध हवा, ऑक्सिजन हवा असेल तर झाडांशिवाय पर्याय नाही

उपवनसंरक्षक सुवर्णा माने यांचे प्रतिपादन; 'स्नेहबंध'तर्फे छावणी परिषद शाळा, परिसरात वृक्षारोपण

नगर – वृक्षसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. बदलत्या निसर्गाने मानवावर विचार करण्याची वेळ आणलीय. आपण एकीकडे कल्पनेच्या पलीकडे गगनभरती घेतली, प्रगती साध्य केली, परंतु आपल्या कृतीने पर्यावरणाचा ऱ्हास होतोय याकडे मात्र दुर्लक्ष केले. याचेच परिणाम आज आपण पाहत आहोत. वाढत्या प्रदूषणामुळे शहरात श्वास घेणे कठीण झालंय. शुद्ध हवा, ऑक्सिजन हवा असेल तर झाडांशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन उपवनसंरक्षक सुवर्णा माने यांनी केले.

स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने भिंगार येथील छावणी परिषदेच्या सरदार वल्लभभाई शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी माने बोलत होत्या. याप्रसंगी 'स्नेहबंध'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, मुख्या. संजय शिंदे, मुख्या. राजू भोसले, शिक्षक शरद पुंड, अंकुश शेळके, अरविंद कुढिया, वैशाली शिंदे, सोनाली झिरपे, अश्विनी यादव उपस्थित होते.

सुवर्णा माने म्हणाल्या वातावरण बदलामुळे पावसाची अनिश्चितता वाढलीय. जागतिक तापमानातील वाढीमुळे पृथ्वीवरील मानवाचं, सजीवांचं अस्तित्व धोक्यात आलं आहे. वृक्ष आपल्याला फक्त पाने, फुलेच देत नाहीत, तर आपल्याला जगण्याची ऊर्जा देतात. नवी आशा देतात. उमेद देतात. म्हणूनच वृक्षसंवर्धन काळाची गरज आहे. वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करा.

महानगरपालिका हे आपले कुटुंब असून सर्वांनी चांगले काम उभे करावे

अध्यक्ष बाबासाहेब मुदगल यांचे प्रतिपादन; अहमदनगर मनपा कर्मचारी युनियन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

नगर – मनपा कर्मचाऱ्यांचे प्रश्न जलद गतीने मार्गी लागावे यासाठी कामगार युनियन काम करत असते. प्रशासक व कामगार यामधील कर्मचारी युनियन एकदुवा असून समन्वयाने चर्चा करून मार्ग काढण्याचे काम केले जात असते. महानगरपालिका हे आपले कुटुंब असून सर्वांनी चांगले काम उभे करावे व नगरकरांना चांगली सेवा द्यावी आरोग्य विभागातील डॉक्टर, सिस्टर व कर्मचारी हे कमी सुविधा असताना देखील रुग्णांना चांगल्या दर्जेच्या आरोग्य सुविधा देत आहेत. त्यामुळेच कै. बाळासाहेब देशपांडे हॉस्पिटलवर नागरिकांचा विश्वास आहे. कर्मचारी युनियनच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न सोडविणे हे आमचे कर्तव्य आहे. मात्र कर्मचाऱ्यांचा वतीने पदाधिकाऱ्यांचा चांगले काम केल्याबद्दल सत्कार केला जातो. त्यातून काम करण्याची ऊर्जा व प्रेरणा मिळत असते आणि अधिक जोमाने काम केले जाते असे प्रतिपादन युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल यांनी केले.

महापालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, सिस्टर्स व कर्मचारी व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करताना मनपा कर्मचारी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल. (छाया – लहू दळवी)

अहमदनगर महानगरपालिकेचा कै. बाळासाहेब देशपांडे हॉस्पिटलमधील आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचा वतीने कामगारांचे प्रश्न मार्गी लावल्याबद्दल मनपा कामगार युनियन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, सरचिटणीस आनंद वायकर, आरोग्य अधिकारी डॉ.सतीश राजूरकर, नंदकुमार नेमाने, राहुल साबळे, महादेव कोतकर, अजय सौदे, सागर साळुंके, प्रकाश साठे, विजय कोतकर,अमोल लहारे, बाळासाहेब व्यापारी, बलराज गायकवाड, अजित तारू, बाबासाहेब राशिनकर, अनंत क्षेत्रे, विकास गीते, भाऊसाहेब सुडके, डॉ.दीपमाला चव्हाण, संगीता दळवी, कविता खिलारी, मनोरमा थोरात, प्रतिभा राऊत, सुनिता चौधरी, स्वाती कांबळे, पल्लवी रामळगिळे,वैशाली अनंतकर, नीलम पारखे, मंदाबिनी दळवे, वर्षा कोल्हे, अबिनी मिमटवार, सुवर्णा शेलार, भारती भोसले, स्वाती पिसे, नंदाबाई घुले, राजश्री धोंगडे, आर्दीसह उपस्थित होते.

डॉ.सतीश राजुरकर म्हणाले की, युनियनच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लागत असतात तरी युनियनने महापालिकेच्या माध्यमातून अधिकारी कर्मचारी भरावे. जेणेकरुन त्यांच्याकडून काम करून घेता येत असते. मात्र ठेकेदार यांच्याकडून कर्मचारी घेतल्यास त्याच्याकडून काम करून घेण्यासाठी काही बंधने येत असतात. यावरबोबर महापालिकेचे अनेक अधिकारी कर्मचारी अनेक वर्षापासून एकाच पदावर काम करत आहे.

तरी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी प्रयत्न करावे. युनियनच्या माध्यमातून अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले कर्मचाऱ्यांचे प्रश्न पाठपुरावा करून प्रशासनाकडून मार्गी लावून घेतले आहे. याबद्दल आरोग्य विभागाच्या वतीने युनियन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आहे, असे ते म्हणाले.

यावेळी युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांचे मनोगत झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब सुडके यांनी केले तर आभार प्रदर्शन कविता खिलारी यांनी मानले.

मौलाना आझाद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट 'मार्टी'ची स्थापना करा

राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जाहीर निषेध

नगर – बार्टी, सारथी व महाज्योतीच्या धर्तीवर अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक विकासासाठी मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (मार्टी) च्या स्थापनेचा ५०० कोटी रुपयाचा मांडण्यात आलेला प्रस्ताव वित्त विभागाने फेटाळून लावला आहे. याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर जाहीर निषेध व्यक्त केला.

मौलाना आझाद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट 'मार्टी'ची स्थापना करावीच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष खान, समीर पठाण, मोसिन पठाण, मुजम्मिल सय्यद, फैयाज तांबोळी, पापामिया पटेल, अल्लाफ शेख, तौफिक पटेल, रफिक शेख, आशिर शेख, सादिक राजे आदी.

महाराष्ट्रातील मुस्लिम समाज हा मागसलेला आहे हे अनेक समित्यांच्या अहवाला वरून सिद्ध झालेले आहे. मुस्लिम समाजाचे मागासलेपण दूर करण्यासाठी व शैक्षणिक विकासासाठी मुस्लिम समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अल्पसंख्याक विभागाने मुस्लिम समाजाच्या विकासासाठी मौलाना आझाद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (मार्टी) ची स्थापन करण्याचा प्रस्ताव केला होता परंतु दुर्दैवाने वित्त विभागाने सदर प्रस्ताव नाकारलेला आहे. तरी ज्याप्रमाणे इतर समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी बार्टी, सारथी, महाज्योती अशा संस्था कार्यरत असताना मराठी मुसलमानावर अन्याय का? असे न होता (मार्टी) ची स्थापना करण्यात यावी व त्यास निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा अध्यक्ष अधर खान, उपाध्यक्ष समीर पठाण, मोसिन पठाण, मुजम्मिल सय्यद, फैयाज तांबोळी, पापामिया पटेल, अल्लाफ शेख, तौफिक पटेल, रफिक शेख, आशिर शेख, सादिक राजे, नूर कुरेशी, मुझू सय्यद आदी पदाधिकारी उपस्थित होते.

जिव्हेश्वर शिवालय मंदिरात ७ ऑगस्टला विविध कार्यक्रम



नगर – सावेडी येथील आर्ट ऑफ लिव्हिंग ध्यान मंदिरा समोरील गावडे मळा, पाईपलाईनरोड येथे जिव्हेश्वर शिवालय मंदिरात श्रावण महिन्याच्या व विणकर दिनाच्या निमित्ताने भगवान जिव्हेश्वर दरबारात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजन वैभव आहेर यांनी दिली

श्री जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळाच्या या मंदिरातील महादेवाच्या पिंडीला पितळी आवरण व नाग देवता तसेच त्रिशूल यांची प्राणप्रतिष्ठा आणि होम हवन कार्यक्रम सकाळी ७ ते दुपारी १२ पर्यंत सौ.मंगल व राजेंद्र शेडाळे या दांपत्याच्या हस्ते होणार आहे. स्वामी समर्थांचा अनुष्ठांचा कार्यक्रम दु.१२ ते १ वा. पर्यंत झाल्यावर महाप्रसाद (भंडारा) दु. १ ते ४ पर्यंत आयोजन करण्यात आला आहे.

कार्यक्रमास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, प्रेरणास्थान स्व. श्रीनिवास जयकुमार कनोरे यांचे आशीर्वाद व जिव्हेश्वर प्रतिष्ठान, स्वकुळसाळी महिला मंच, श्री जिव्हेश्वर भक्त सेवा महिला मंडळ, महिला भजनी मंडळ, युवा कार्यकर्ते, समाज बांधव व मित्र परिवार यांचे विशेष सहकार्य तसेच सोमनाथ खाडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

सर्व भाविक–भक्तांनी, समाजबांधवांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन मंदिराचे पुजारी व युवक अध्यक्ष वैभव आहेर, मंडळाचे अध्यक्ष अविनाश झिकरे, उपाध्यक्ष प्रकाश मारवाडे, खजिनदार नंदकुमार सुपेकर, सचिव संजय मते, महिला मंडळ अध्यक्ष स्नेहल कौसल्ये, सर्व पदाधिकारी व समाज बांधव यांनी केले आहे

नेप्तीत सावता महाराज पुण्यतिथी मध्ये सहभागी झालेले ग्रामस्थ.

नेप्तीत सावता महाराज पुण्यतिथी साजरी

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात संत सावता महाराज पुण्यतिथी विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. सावता महाराज तरुण मंडळ, माळी समाज व नेप्ती ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध कार्यक्रम पार पडले.

३१ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह झाला. या सप्ताहात सायंकाळी ५ ते ७ या वेळात हरिपाठ व सायंकाळी ७ ते ९ या वेळेत कीर्तन झाले. या किर्तनाला हरीहरेश्वर वारकरी शिक्षण संस्था इसळक व नेप्ती भजनी मंडळ यांची साथसंगत होती. बुधवारी भाग्यश्रीताई महाराज शिंदे केडगाव यांचे कीर्तन झाले. गुरुवारी (दि.१ ऑगस्ट) महादेव महाराज घोडके घोसपुरी यांचे कीर्तन झाले तर शुक्रवारी (दि.२ ऑगस्ट) रोजी सायंकाळी टाळ–मृदंगाच्या गजरात गावातून मध्य दिंडी मिरवणुक काढण्यात आली होती. या धार्मिक सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. ७ वाजता वाजता तुळशीगाम महाराज लबडे भातोडी यांचे कीर्तन झाले.

३ ऑगस्टला सकाळी ९:३० वा. शिवचरित्रकार आकाश महाराज फुले यांचे काल्याचे किर्तन झाले. आकाश महाराज फुले म्हणाले की, कांदा मुळ्यांची शेती फुलवून खरा भक्ती मार्ग दाखविणारे संत सावता महाराजांचे कार्य महान आहे. त्यांनी जीवनात कर्मांला महत्त्व दिले. कामातच त्यांनी देव पाहिला. पंढरपूरला ते गेले नाहीत, मात्र त्यांच्या भक्तीने साक्षात पांडुरंग त्यांना भेटावयास आले. कर्तव्य, कर्म करीत राहणे ही एक प्रकारे ईश्वरी सेवा असल्याचा संदेश त्यांनी दिला. यावेळी भाविकांनी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

९ ऑगस्ट नागपंचमीदिनी 'आडकर चष्म्याचे तज्ञ'चे ८६ व्या वर्षात पदार्पण

बहुरत्नानी वसुंधरा – ही पृथ्वी निरनिराळ्या व रत्नांनी समृद्ध आहे – कित्येक वेळा परमेश्वर आकाशात देखील नजीकच नेत्रांची मुक्त हस्ते उधळण करुन सुशोभिर्दाव्यांस अनुपम आविष्काराने मनाला मोहवित असतो. निसर्गाचं हे साजरे रूप पाहून आनंद आश्चर्य शतगुणित होतो... हे सर्व पाहायला डोळे हवेत... हे डोळे देणार आहे निसर्गाच... मानवी मनात चाललेल्या घडामोडींवी निदर्शक डोळेच ही भूमिका पार पाडतात... डोळे ही मनाची खिडकी आहे.. मानवी शरीरातील इंद्रियात डोळ्यांचे स्थान अद्वितीय आहे... आणि डोळ्यांशी निगडित चष्म्याच्या विश्वात नागरमध्ये आडकर चष्म्याचे तज्ञ – ही फर्म देखील अद्वितीय आहे



ऑप्टोमेट्रीस – नयन आडकर

माझे परमस्नेही राजू आडकर यांनी आपल्या वडिलांचा डॉ. नारायणराव यांच्या व्यावसायिक वारसा डोळसपणे समृद्ध करुन नावलौकिक वाढविला.

डॉ. नारायणराव श्री. आडकर यांनी १९३९ साली वैद्यकीय व्यवसायातील पदवी घेऊन आडकर चष्म्याचे तज्ञा या फर्मची स्थापना केली. आहमदनगर जिल्ह्यामधे परिसरात त्यावेळेस हा व्यवसाय कोणी करत नव्हते. सृष्टी पाहण्यासाठी दृष्टी चांगली हवी आणि ही दृष्टी सुधारण्यासाठी चष्म्याची खूप वेळा आवश्यकता भासते. चष्मा लावल्यानंतर दृष्टी सुधारुन बघता येते. या गोष्टीचा डॉ. नारायणरावांना प्रचार व प्रसार करावा लागला. त्यावेळीच्या काळाची गरज ओळखून त्यांनी टाकलेले व्यवसायिक प्रांगणातील हे पाऊल अत्यंत यशस्वी ठरले. सुरुवातीला डोळे तपासून चष्मा घेणे ही कल्पनाच नवीन होती. काचा व फ्रेम्स याच्या आकाराला मर्यादा होती. सांप्रत काळी यामध्ये आमुलाग्र बदल झालेले आहेत व हे बदल त्वरित आत्मसात केल्याने लोकांना जे हवे ते आडकरांकडे मिळू लागले. आणि ग्राहकांच्या उदंड प्रतिसादाने आडकर चष्म्याचे तज्ञा या फॉर्मचा वेलू प्रगतीच्या गगनावरी गेला. त्याचे मर्म नारायणरावांची व्यवसायिक दूरदृष्टी व अथक परिश्रम– अंगीकृत व्यवसायावर आढळ निष्ठा व निरनिराळे प्रयोग यशस्वी करण्याची क्षमता यात आहे. त्यावेळेस मुंबईमध्ये चष्म्याच्या बाबतीत जी गोष्ट नव्याने तयार होत असे ती पुण्याच्या आधी नागरमध्ये आणून डॉक्टरांनी ती ग्राहकांना उपलब्ध करुन दिली. त्यामुळे ग्राहकांच्या ह्दयात 'आडकर चष्म्याचे तज्ञा' या फर्मचे स्थान ध्रुवप्रमाणे अढळ आहे. फर्मवर ग्राहकांचा विश्वास व सचोटी या दोन पंखांनी घेतलेली गरुड ज्ञेय यशस्वीतेच्या क्षितिजाला स्पर्शून समृद्धीच्या आकाशाला या फर्मने गवसणी घालती यावे श्रेय डॉक्टरांची दूरदृष्टी.

पुढे डॉ. नारायणरावांचे सुपुत्र राजू आडकर यांनी या व्यवसायात पदार्पण केले. त्यांनी उच्च दर्जाच्या ब्रँडेड फ्रेम्स, ग्लासेस व गॉगल्स ४० वर्षापूर्वी नगरमध्ये आणल्या. जगप्रसिद्ध कंपन्यांच्या एजन्सीज मिळवून अत्याधुनिक डिझाइन्सचे गॉगल्स नगरमध्ये आणणारे आडकर हे या क्षेत्रातील **pioneer** आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

संगणकाद्वारे नेत्र तपासणी करुन उच्च दर्जाचे चष्मे व कॉन्टॅक्ट लेन्स विक्री जिल्ह्यात प्रथम आडकरांनीच सुरू केली. कॉन्टॅक्ट लेन्सेस प्रशिक्षणाचा कार्यक्रम एका कंपनीच्या सहकार्याने राजू आडकर यांनी डोळ्याचे डॉक्टर्स आणि पोस्ट ग्रॅजुएट विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला. ज्यामध्ये जिल्ह्यातील डोळ्याचे डॉक्टर्स व पोस्ट ग्रॅजुएट विद्यार्थ्यांची प्रमुख उपस्थिती होती. राजू आडकर हे महाराष्ट्र ऑप्टिकल फेडरेशन या नावाच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहिले आहेत. संघटने मार्फत चष्मा व्यवसायातील अडचणी सोडविण्यासाठी औरंगाबाद, नाशिक, सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि अर्थात अहमदनगर इ. ठिकाणी व्यावसायिक संघटना स्थापन करण्याच्या त्यांच्या स्तुत्य प्रयत्नाला भरीव यश प्राप्त झाले. पुण्यातील आयोजित केलेल्या कार्यक्रमास सुमारे ४०० ऑप्टिशियन्स हजर होते. मुंबईच्या रिटेल दुकानदारांच्या वार्षिक स्नेहत दोन वेळा राजू यांनी केलेले भाषण वितान्यि व मार्गदर्शक पर होते. साधारणपणे २५ वर्षापूर्वी लायन्स क्लब ऑफ अहमदनगर सन्मानीय अध्यक्षपद भूषवताना राजू आडकरांनी अनेक सामाजिक सेवा कार्यामध्ये मग्न घेऊन डॉ. एम. सी. मोदी एक जगन्नाथ नेत्रज्ञत्ञ यांच्या समवेत **P.R.O.** चे काम करुन नेत्र शिबिरे यशस्वी केली. सर्वात महत्वाचे म्हणजे रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्त्यावर खडी फोडणाऱ्या गरीब मजुरांच्या डोळ्यात उडणाऱ्या दगडांच्या बारीक तुकड्यांने अपाय होऊन डोळे निकामी होत असत. यावर राजू आडकर यांनी सुयोग्य प्रयोगशीलता व विषयातील सखोल ज्ञान यांच्या आधारे एक सेफ्टी गॉगल तयार केला. त्यामुळे कामगारांचे डोळे वाचले अशा तऱ्हेने तयार केलेला सेफ्टी गॉगल राजू आडकर यांनी त्यावेळीचे रोजगार हमी योजना जनक वि. स. पागे यांना दाखविला त्यांना तो आवडला.राज्य सरकारनी असा गॉगल मजुरांना काम करताना द्यावेत असा जी आर महाराष्ट्र राज्य सरकारकरची काढला आणि राजू आडकरांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. अशा तऱ्हेने व्यवसाय करताना सामाजिक बांधिलकीचे कार्य गाजावाजा न करता राजू आडकर करीत आहेत.

आडकरांचे चष्म्याचे दुकान तसे ८५ वर्षापूर्वी स्थापन झालेले, पण दुकानातील स्टॉक एकदम अपडेटेड असून, दृष्टीशास्त्र या विषयातील सखोल ज्ञान व नवनव्या ब्रँडेड गॉगल्स व फ्रेम्स कॉन्टॅक्ट लेन्सेस उपलब्ध असलेले हे दुकान म्हणजे नागरचे एक वैभव आहे. राजू आडकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव नयन आडकर यांनी **optometry** चा ४ वर्षाचा डिग्री कोर्स पूर्ण करुन हा व्यवसायात संपूर्ण स्वतःला झोकून दिलेले आहे, आणि प्रगतीची शिखरे तो कायीम करीत आहे. **Hats off to him!** बाप से बेटा सवाई ही परंपरा त्यानेही कायम ठेवलेली आहे.

व्यवसायाशी प्रामाणिक राहून 'उद्यम' विनयेन शोभते हे राजू आडकरांच्या कार्यशैलीवरून समजते. ग्राहकांना त्यांच्या पैशाचा पुरेपूर मोबदला मिळावा हा त्यांचा प्रयत्न असतो.

८६ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या माझ्या मित्राच्या व्यवसायाला अगणित शुभेच्छा.

– डॉ. श्रीकांत गांधी

मस्त चविष्ट मसाला शेवया

झटपट रेसिपी

न्या हरीचा एक उत्तम पर्याय म्हणजे मसाला शेवया. हा झटपट तयार होणारा आरोग्यदायी पदार्थ आहे. हॉस्टेलमध्ये काही तरी वेगळं ट्राय करायचं असेल तर मसाला शेवया नक्की करून बघा.

सामग्री: एक कप भाजलेल्या शेवया, एक बारीक चिरलेला कांदा, बारीक चिरलेला टोमॅटो, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, अर्धा कप उकडलेले मटार, एक बारीक चिरलेली सिमला मिरची, अर्धा चमचा जीरं, अर्धा चमचा लाल तिखट, प्रत्येकी अर्धा चमचा हळद आणि धनेपूड, एक चमचा गरम मसाला, लिंबाचा रस, एक कप पाणी, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ

कृती: कढईत दोन ते तीन चमचे तेल गरम करा. त्यात जीरं घाला. मग कांदा परतून घ्या. यानंतर सिमला मिरची आणि मटार घालून परता. सोबत आलं-लसूण पेस्ट घाला. मग लाल तिखट, धनेपूड, हळद घालून परतून घ्या. मसाल्यातून तेल सुटलं की त्यात शेवया घाला. चवीनुसार मीठ घाला. पाणी घालून शिजवून घ्या. पाणी आटल्यावर गरम मसाला घाला. दोन मिनिटं शिजू द्या. गॅस बंद करा. शेवयांवर कोथिंबिर घाला. गरमागरम खा.

फॅन्सी ऑफिसवेअर

दो स्तांनो, कामाच्या ठिकाणी स्टायलिश दिसण्यासोबतच आरामदायीही वाटायला हवं. त्यातच फॉर्मल्समध्ये आपलं व्यक्तिमत्त्वही उठून दिसायला हवं. यासाठी तुम्ही ट्राउझर्सचे काही लेटेस्ट ट्रेंड ट्राय करू शकता.

✻ अँटी फ्लेक्स

ट्राउझर्समध्ये तुम्हाला आरामदायी वाटू शकतं. या ट्राउझर्सच्या कंबरेला स्ट्रेच होणारा बँड दिलेला असतो. यामुळे या पँट्स व्यवस्थित बसतात. यासोबतच पँटच्या खिशांना सेफटी झिपर्सही असतात.

✻ सध्या लाईटवेट

ट्राउझर्सही मिळतात. कमी वजनाच्या या ट्राउझर्समध्ये तुम्ही आरामात वावरू शकता. या ट्राउझर्स तयार करण्यासाठी आरामदायी फॅब्रिक्स वापरले जातात. या दिसतातही खूप छान.

✻ शार्प आणि स्लिक

दिसण्यासाठी ड्रेस पँट्स ट्राय करा.

फॅशन पॅशन

या पँट्स तयार करण्यासाठी खास कापड वापरलं जातं. यामुळे त्यावर सुरकुत्या पडत नाहीत. खूप धावपळीचं काम करणाऱ्यांसाठी या ट्राउझर्स योग्य ठरतात.

✻ व्यायाम केल्याने आपल्या शरीरयष्टीत बदल होतो. मग पँट्स नीट बसत नाहीत. त्यामुळे व्यायामाला महत्त्व देणारी मुलं ड्राप पँट्स ह्या प्रकार ट्राय करू शकतात. या पँट्स आपल्या शरीरयष्टीनुसार अंगावर बसतात.

ऑफिसवेअर म्हणूनही या पँट्स ट्राय करता येतील.

आवडत्या क्षेत्रात उमटवली मोहोर!

मित्रांनो, आपण आवड म्हणून एखादे क्षेत्र निवडतो तेव्हा पुढचा प्रवास सुखकर होतो. कारण आवडीच्या क्षेत्रामध्ये काम करायला सगळ्यांनाच आवडते. परिणामी, कामातही अचूकता येते. याचेच एक उदाहरण म्हणजे पुण्यातील योधी तायक्वांदो ॲकेडमीचे राजेश पुजारी.

१९ ९१ साली राजेश आणि त्यांच्या बहीणने आवड म्हणून कराटे क्लासला जाण्यास सुरुवात केली आणि १९९७ पर्यंत त्या क्षेत्रातील उच्च मानला जाणारा ब्लॅक बेल्ट राजेश यांनी मिळवला.

कराटेचे प्रशिक्षण घेत असतानाच त्यांची प्रगती बघून एका प्रशिक्षकांनी राजेश यांच्यापुढे एका जिममध्ये कराटे क्लासेस सुरु करण्याचा प्रस्ताव मांडला. अर्थातच राजेश यांनी त्यासाठी होकार दिला. त्यांचा वडिलोपार्जित हॉटेलचा व्यवसाय असल्याने त्यांनी तोच पुढे सांभाळावा, या कारणास्त्व क्लासेस सुरू करण्यासाठी घरून विरोध झाला. परंतु, शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी न करता व्यवसाय करायचा हे राजेश यांनी ठरवले होते. मग मात्र वडिलोपार्जित व्यवसाय न करता स्वतःची तायक्वांदो ॲकेडमी सुरु करावी अशी त्यांची खूप इच्छा होती. शेवटी घरच्यांना विश्वासात घेऊन तायक्वांदो प्रशिक्षक म्हणूनच करिअर करायचे हे ठरले.

अचिव्हर

तिथून राजेश यांचा कोचिंगचा प्रवास सुरु झाला. विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगणे आणि समोरच्याला समजून घेऊन, संयम ठेऊन प्रशिक्षण देणे हे धोरण राजेश यांनी अगदी सुरुवातीपासून ठेवल्याने अनेक स्पर्धांमध्ये त्यांच्या विषयार्थ्यांना यश मिळण्यास सुरुवात झाली. जिममध्ये मिळालेल्या कोचिंगच्या अनुभवामुळे राजेश यांचा आत्मविश्वास वाढला आणि आपण मुलांना हा खेळ शिकवू शकतो हे राजेश यांना कळले. मग १९९८ साली त्यांनी कराटेच्या क्लासची सुरुवात केली. कोचिंगचा दांडगा अनुभव असल्याने स्वतःच्या क्लासमध्ये मुलांना हाताळणे त्यांना सोपे गेले. सहा महिन्यातच इंडियन कराटे क्लबमध्ये झालेल्या स्पर्धेत क्लासच्या विद्यार्थ्यांना सहा सुवर्ण, पाच रौप्य आणि सात कांस्य पदके मिळाली. २०१९ साली भारतीय कोच म्हणून देशाकडून एका टीमचे नेतृत्व करण्याची राजेश यांना संधी मिळाली. २०२२ साली थायलंड येथे झालेल्या स्पर्धांमध्ये आंतरराष्ट्रीय पंच म्हणून काम करण्याचा अनुभव घेता आला.

कोणतेही क्षेत्र निवडताना त्याची आवड असणे गरजेचे आहे. आवड असल्यास त्या क्षेत्रात आपली प्रगती ही निश्चित आहे. When your passion is your career, you always enjoy it. असं ते आवर्जून सांगतात. इतर क्षेत्रांप्रमाणेच क्रीडा क्षेत्रालाही चांगले दिवस आले आहेत आणि त्यातच करिअर करता येऊ शकते हे राजेश यांनी सिद्ध करून दाखवले.

जोश

शेर की जुबानी

दिल के लिये हयात का,
पैगाम बन गई,
बेचैनियां सिमट के तेरा,
नाम बन गई।

दिल पर हम बेवजहा
इल्जाम लगाते हैं,
धोका तो अक्सर
धडकन दिया करती है।

ये दोस्ती भी एक रिश्ता है,
जो निभा दे वो फरिश्ता है।

व्हॉट्स न्यू?

आयफोन झाले स्वस्त

अर्थसंकल्प २०२४ मध्ये अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्मार्टफोन आयातीवरील शुल्कात कपातीची घोषणा केली. बेसिक कस्टम ड्युटी २० टक्क्यांहून १५ टक्क्यांवर आणण्यात आली आहे. या घोषणेनंतर ॲपलने आयफोनच्या किंमतीत तीन ते चार टक्क्यांपर्यंत कपात केली आहे. त्यामुळे आयफोन १५ आणि १४ सह इतर मॉडेलच्या किंमतीत कपात झाली आहे. फोनच्या किंमतीमध्येजवळपास ३०० ते ५९०० रुपयांपर्यंतची कपात झाली आहे.

स्मार्ट टिप्स

झटपट क्रिएट करा फाईल

विविध कामांसाठी गुगल डॉक्स, शीट्स आणि फाईल्सचा वापर केला जातो. मात्र यावर फाईल क्रिएट करण्याची आणि नंतर ओपन करण्याची प्रक्रिया थोडी किचकट असते. आता मात्र शॉर्टकट्सचा वापर करून एका क्लिकवर फाईल्स क्रिएट करता येतील. गुगल डॉक्सवर फाईल क्रिएट करण्यासाठी आधी ब्राउजर ओपन करा. मग ॲड्रेस बारमध्ये डॉक. न्यू, डॉक्स डॉट न्यू किंवा डॉक्युमेंट डॉट न्यू टाईप करा. अशा प्रकारे नवं गुगल डॉक क्रिएट होईल.

ॲप वर्ल्ड

जिओची धमाकेदार ऑफर

नुकतीच जिओने आपल्या एअरफायबर ग्राहकांसाठी एक नवी ऑफर आणली आहे. तुम्ही जिओचे एअरफायबर कनेक्शन घेऊ इच्छित असाल तर ही तुम्ह्यासाठी चांगली संधी आहे. जिओच्या नव्या ऑफरनुसार तुम्ह्यांकडून कोणत्याही प्रकारची इन्स्टॉलेशन फी घेतली जाणार नाही. तुम्हाला एअर फायबर घ्यायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला जिओची अधिकृत वेबसाइट गळे.लो वर जावे लागेल. येथे तुम्हाला जिओ फायबरसाठी ६०००८-६०००८ वर मिस्ड कॉल द्यावा लागेल. जिओने आपल्या क्रीडम ऑफर अंतर्गत एअर फायबर यूजर्ससाठी ३० टक्के सवलतीची घोषणा केली आहे. १५ ऑगस्ट पर्यंत दरम्यान जोडल्या जाणाऱ्या सर्व एअरफायबर यूजर्ससाठी १००० रुपयांचे शुल्क माफ केले जाणार आहे.

बी अलर्ट

स्मार्ट डिव्हाइस वापरताय?

स्मार्टफोननंतर आता स्मार्ट होम डिव्हाइसचा वापरही वाढला आहे. मात्र ही डिव्हाइस तुमची सुरक्षा धोक्यात आणू शकतात. घरात बसलेले स्मार्ट होम स्पीकर्स तुमची माहिती उघड करू शकतात. त्यामुळे ही स्मार्ट डिव्हाइस वापरताना विशेष काळजी घ्यायला हवी. खासगी बोलणी करताना ही डिव्हाइस अनप्लग करा किंवा त्यापासून लांब जा. स्मार्टफोनमधला गुगल असिस्टंट डिसेबल करता येईल.

कलात्मक करिअरचा उत्तम पर्याय

मि त्रांनो, सोशल मीडियाचे जग वाढत आहे. जगभरात फॅशन इन्फ्लुइन्सर्स आपली छाप पाडत आहेत. अशातच फॅशन म्हणजे काय हे माहीत असेल, या क्षेत्रातील नवनवीन ट्रेंड तुम्ही फॉलो करत असाल, विक्री कौशल्य असेल तर या फॅशन उद्योगात आपले स्थान निर्माण करण्याची संधी गमावू नका. हे क्षेत्र नेहमीच आकर्षक राहिले आहे. त्यामुळे फॅशन डिझायनर होण्यासाठी आवश्यक असलेली काही कौशल्ये आत्मसात करायला हवी. या क्षेत्रामध्ये करिअर करायचे असेल तर भारतात अनेक प्रतिष्ठित संस्था आहेत. भारतातील सर्वोत्कृष्ट डिझाईनिंग स्कूलमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रशिक्षण देणाऱ्या अनेक प्री-इन्स्टिटयूटस आहेत. या क्षेत्रामध्ये कलात्मक, सर्जनशील, कठोर मेहनत आणि उत्साही लोकांसाठी अमाप संधी उपलब्ध आहेत. पदवी अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर तुम्ही स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकता. किंवा नामांकित कपड्यांच्या दुकानांमध्ये, टेक्सटाइल मिल्समध्ये, बुटीकमध्ये, फॅशन शोजसाठी आयोजक येथे फॅशन सल्लागार म्हणूनही काम करण्याची संधी असते. त्यामुळे आवड असेल तर हे क्षेत्र नक्की आजमावले पाहिजे.

वेगळ्या वाटा

दिसण्यावर जाऊ नको

